**BEFORE THE NATIONAL GREEN TRIBUNAL,**
**WESTERN ZONE, BENCH AT PUNE**

Original Application No. 79 / 2023 ( WZ )

District – Aurangabad

Dr. Pramod s/o. Eknathrao Jadhav and others, **APPLICANTS**

**VERSUS**

The State of Maharashtra and others, **RESPONDENTS**

**AFFIDAVIT – IN – REPLY**
**( ON BEHALF OF THE RESPONDENT No. 4**
**The Chief Executive Officer, Zillha Parishad, Aurangabad )**

**MOST RESPECTFULLY SHOWETH** :

1. I Vinayak s/o. Shahu Rathod, Age – 57 years, Occupation – Block Development Officer, Panchayat Samiti, Phulambri, do hereby state on solemn affirmation that, I have gone through the contents of the Original Application and I have verified office record and thus being authorized representative of the Respondent No. 4, filing this Affidavit – in – reply on the basis of the documents and records available with the office of the Zillha Parishad, Aurangabad, which is as follows :

2. I respectfully say and submit that, the present affidavit in reply is being filed by me for the purpose of admission hearing only,

BEFORE ME

SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No: 6724

and I crave to leave and liberty to file detailed affidavit in reply, if necessary, or required. I also say that the contentions, which are not specifically denied or admitted, may kindly be treated and presumed as denied.

3. In reply to the Paragraph No. 12.1 the deponent submits that, the information may right / true and, the deponent offers no comment, due to lack of knowledge and information.

4. In reply to the Paragraph No. 12.1 the deponent submits that, the information may right / true but it is denied that the diseases were developed because of the water provided by the Grampanchayat.

5. In reply to the Paragraph No. 12.3 of the Application, the deponent respectfully submits that, Radico distilleries has caused damage to the Enviornment by releasing or discharging the company pollutant sewage water into the nearby area of the residents of the Applicant and others, and because of the pollutant sewage water, the drinking water of the Applicants got polluted / pollutant and 2 persons have died wheras, more than 200 others are suffered from severe diseases and therefore, on 14.12.2017, it has been resolved by the then Standing Committee, of the the Zillha

BEFORE ME
SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No. 6724

Parishad that, the necessary communications to be sent to the concerned departments or Maharashtra Pollution Control Board, in this regard so that, necessary examination, investigations can be carried out in respect of the water to ascertain the gravity and percentage of the damage caused to the drinking as well as, ground water, water from the water reservoirs and thereafter, necessary action can be taken against the Company.

6. Accordingly, the Respondent No. 4 by outward letter No. 0199 / 2018 dated 10.01.2018 informed Block Development Officer, Panchayat Samiti, about the same and directed him to take necessary action immediately and was asked to submit report in this regard. Copy of the letter outward No. 0199 / 2018 dated 10.01.2018, is annexed herewith and marked as **EXHIBIT – R4 – A**.

7. Thereafter, Respondent No. 4 by outward letter No. 0480 / 2018 dated 24/29.01.2018 asked Regional Officer, of the Maharashtra Pollution Control Board, Aurangabad, about the same and directed him to take necessary action against the responsible company / person immediately and was asked to submit report in this regard. Copy of the letter outward No. 0480 / 2018 dated

BEFORE ME
SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No. 6724

24/29.01.2018, is annexed herewith and marked as **EXHIBIT – R4 – B**.

8. In reply to the Paragraph No. 12.4 and 12.5 of the Application, the deponent submits that, the deponent offers no comment, due to lack of knowledge and information.

9. The deponent respectfully submits that, in view of the complaints received and in view of the communications made to the Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Aurangabad, spot inspection were done and necessary samples were collected from the spot.

10. Necessary charges for the lab testing also been deposited by the Block Development Officer, Panchayat Samiti, Phulambri, on 01.01.2020. Copy of the Challan dated 01.01.2020, is annexed herewith and marked as **EXHIBIT – R4 – C**.

11. Gramsevak was also directed to take immediate action, and as per directions, Gramsevak also collected water samples from the land of certain residents / villagers and submitted the same with the Director, Groundwater Surveys and Development Agency, Aurangabad and requested to do the testing / investigation of the

BEFORE ME
SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No. 6724

same water samples and give testing report accordingly. Copy of the letter dated 03.01.2020, is annexed herewith and marked as **EXHIBIT – R4 –** D

12. Residents from the said vicinity were taking water from the field of adjacent land owners and some of them were buying water tankers, this information was received by the Block Development Officer, Panchayat Samiti, Phulambri, considering the same, one borewell / tubewell which was taken in the last year, water sample from the same also been sent to the laboratory, water from the same is found potable. Therefore, by letter dated 13.01.2020, it is requested to SDO, Phulambri – Paithan, to incorporate the said proposal in the coming year Estimate, so that the Water pipeline can be arranged for the villagers through which the potable water can be supplied to these residents. Copy of the letter dated 13.01.2020, is annexed herewith and marked as **EXHIBIT – R4 –** E

13. Report from the office of the Director, Groundwater Surveys and Development Agency, dated 13.01.2020 received. It is showing water from some of the samples FIT and some of them is UNFIT for drinking. Copy of the report dated 13.01.2020, is annexed herewith and marked as **EXHIBIT – R4 –** F

BEFORE ME

SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No. 6724

6 82

14. Resolution also been passed in Gramsabhha to submit proposal before the Block Development Officer, Panchayat Samiti, Phulambri, to make arrangement of temporary water pipeline for the villagers or residents of the said vicinity. Accordingly, proposal was forwarded to the Block Development Officer, Panchayat Samiti, Phulambri on 22.01.2020. Copy of the proposal dated 22.01.2020, submitted to the Block Development Officer, Panchayat Samiti, Phulambri, is annexed herewith and marked as **EXHIBIT – R4 –** G

15. But as already the work of the pipeline under Jal Jeevan Mission Scheme was undertaken, the same was informed to the Tehsildar, Phulambri by the Block Develoment Officer, Phulambri. Copy of the letter dated 30.01.2023, is annexed herewith and marked as **EXHIBIT – R4 –** H

16. In reply to the Paragraph Nos. 12.6 to 12.21 of the Application, the deponent offers no comment.

17. In reply to the Paragraph Nos. 12.22, of the Application, the deponent submits that, as it is noticed that, the water from the well, and reservoirs is contaminated, immediately, the proposal was put forth to make an arrangement for supply drinking water through the

BEFORE ME
SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No. 6724

7

tankers and accordingly, the water supplied through the tankers till the work of the pipeline will be completed.

18. In reply to the Paragraph Nos. 12.23 to 12.25 of the Application, the deponent offers no comment.

19. In reply to the Paragraph Nos. 12.26 of the Application, the deponent submits that, it is true as per the report issued by the Regional Laboratory, Aurangabad.

20. In reply to the Paragraph Nos. 12.27 and 12.29 to 12.32 of the Application, the deponent offers no comment.

21. In reply to the Paragraph Nos. 12.33 of the Application, the deponent submits that, Applicants are residing in their field / Agriculture Farm. Initially water was provided through the Water Tankers but thereafter due to scarcity of water, it was not possible to make available tankers as per requirement and therefore, on 28.09.2023 Monthly meeting / Gramsabha was taken up by the Grampanchayat and it was resolved to fix / fit the Hand Pump on the Tube Well but the owner of Gut No. 40 did not permit to fix / fit Hand pump.

BEFORE ME

SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No. 6724

8

22. In reply to the Paragraph Nos. 12.34 to 12.35 of the Application, the deponent offers no comment.

23. In reply to the Paragraph Nos. 12.36 of the Application, the deponent submits that, it is a part of the record that the learned Collector, Chhatrapati Sambhaji Nagar was party Respondent in Cast No. 6832 / 2018 filed before the National Human Rights Commissioner and reply was filed on his behalf.

24. The deponent submits that, in view of the letter dated 20.12.2019 issued by the Grampanchayat. The deponent submits that, it is true that the water supply through the tankers from the Shendra MIDC was stopped due to rain, since 27.06.2019. As per the orders of the SDO, Aurangabad the committee was constituted having Block Development Officer, Tehsildar and Sr. Geologist members in the committee. Committee submitted its report to the SDO, Paithan and Phulambri, Aurangabad on 13.01.2020. As per the report daily 3000 ltrs. of water is required for the peoples from the mauje Pathri from Gut No. 123, 140, 141 and 143. In the las year due to paucity of the water one well was digged in the vicinity for the drinking water and the water has been inspected / tested from the Organic and Chemical analysis laboratory, and the water is found suitable/ potable for the drinking purpose. It is also proposed in the

BEFORE ME
SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No. 6724

report that to make an arrangement for the drinking water from the water cress / jalkumbh through the pipeline. Accordingly, the under the National Water Scheme the survey is going on in this regard and separate pipeline work but as per the letter or report dated 23.11.2022, it is difficult to comply with the work due to paucity of funds which is allottedunder the 15th Finance Commission, the proposal has been forwarded and filed under the TPWS Scheme. As per Jal Jeevan Mission Scheme also the water supply scheme has been sanctioned to supply drinking water at Pathri. It is also important to note and mention here that, R. O. Plant also been established by the Grampanchayat, at the village level and all the residents from the vicinity are using from this R. O. Plant water for drinking purpose. The deponent – Chief Executive Officer, Zillha Parished, Aurangabad also has issued work order no. 1155 / 28.02.2023 under the Jal Jeevan Mission Scheme for arranging the drinking water at Village Pathri.

25. In reply to the Paragraph No. 12.42 of the Application, the deponent submits that, it seems from the order at ANNEXURE – A – 37, that the Writ Petition was filed before the Honourable High Court of Judicature at Bombay, Bench at Aurangabad and has been withdrawn with liberty to approach this Honouable National Green Tribunal.

BEFORE ME

SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No. 6724

26. In reply to the Paragraph No. 12.43 of the Application, the deponent submits that, it seems from the order at ANNEXURE – A – 38 and 39, that the Original Applications are filed before this Honourable National Green Tribunal, and orders are passed thereon.

27. In reply to the Paragraph No. 12.45 of the Application, the deponent submits that, it seems from the order at ANNEXURE – A – 38, that the Original Application No. 3 / 2023 has been filed by Sandip s/o. Sheshrao Jadhav before this Honourable National Green Tribunal, and orders are passed thereon.

28. In reply to the Paragraph Nos. 12.37 to 12.41 and 12.44 of the Application, the deponent offers no comment.

29. The deponent respectfully submits that, as soon as, the complaint is received by the office of the deponent, the necessary action has been taken on the complaint and necessary directions were given to the concerned department to provide water to the residents of the adjacent villages from the affected area.

30. The Respondent herein trying to resolve the issue and making each and every attempt to arrage potable water for the villagers,

BEFORE ME

SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No. 6724

therefore, he prays before this Honourable Tribunal that, the Application filed by the Applicant may kindly be dismissed. Grounds stated in the Applicaton are vague in nature and are baseless, devoid of substance, meritless and are denied in toto. Considering all above averments made in the Affidavit in reply, the contentions and grounds mentioned in the Application needs to be discarded and Applicaion deserves to be dismissed.

Hence this Affidavit – in – reply.

Date – 30.10.2023
Place – Aurangabad

Vinayak s/o. Shahu Rathod,
Deponent – Respondent No. 4,

BEFORE ME
SHIVKUMAR B. PATIL
Notary Govt. of India
Reg. No. 6724

12 88

## VERIFICATION

I Vinayak s/o. Shahu Rathod, Age – 57 years, Occupation – Block Development Officer, Panchayat Samiti, Phulambri, do hereby state on solemn affirmation that, whatever stated herein above from paragraph nos. 1 to 30 are true and correct to the best of my knowledge and information and record, which i have been conveyed and explained in vernacular language i.e. in Marathi, which i believe to be true and correct to the best of my personal knowledge and belief.

Hence verified on this ~~30th~~ 3rd day of ~~October~~ Nov. 2023 at Aurangabad.

Date – 30.10.2023
Place – Aurangabad

Vinayak s/o. Shahu Rathod,
Deponent – Respondent No. 4,

Identified and explained by me

Adv. Anuradha S. Mantri,
Advocate for Respondent No. 4,

NOTED & REGISTERED
AT SR.No. 10229 .2023
THIS DOCUMENT CONTAINS 12 PAGES

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

AFFIDAVIT
Solemnly affirmed before me
by Shri/Smt. Vinayak Shahu Rathod
R/o. Phulambri
Tq. Phulambri Dist. A'bad
Who is identified by A. S. Mantri
whom he/she is personally known

BEFORE ME
03/11/2023

SHIVKUMAR BASWANTRAO PATIL
Advocate & Notary Govt. of India
Reg.No. 6724

NOTARY GOVT. OF INDIA
S.B.PATIL
Area Aurangabad Dist.
Reg. No. 6724
Exp.15-09-2028

754

E2e- RU-17 13

अतितत्काळ,
प्रदुषण नियंत्रण महत्वाचे,

0199
जा.क्र.जि.प.औ/2 पंचायत /कावी/20
कार्यालय जिल्हा परिषद,औरंगाबा
दिनांक:-10.01.2018.

प्रति,

गट विकास अधिकारी
पंचायत समिती,**गंगापूर/औरंगाबाद/पैठण.**

**विषय**:- औद्योगिक कारखान्यात प्लान्टवरील झालेली रासायनीक प्रक्रियेनंतर उघडयावर सोडलेल्या दूषीत सांडपाणीच्या विल्हेवाटी बाबत.
**संदर्भ**:-1) या कार्यालयाचे समक्रमांकित पत्र दिनांक 23.10.2017,स्मरण पत्र क्रमांक 1 दिनांक 8.12.2017.
2)प्रादेशिकअधिकारी,महाराष्ट्रप्रदूषण नियंत्रण मंडळ,प्रादेशिक कार्यालय,प्लॉटनं.अे-4/1,दैनिक लोकपत्रच्या मागे,चिकलठाणा औद्योगिक क्षेत्र,जाल रोड औरंगाबाद या कार्यालयास भेट दिनांक 06.12.2017.
3) श्री.रमेश गायकवाड,जि.प.सदस्य,ता.जि.औरंगाबाद यांनी कंपनी परिसरातील नागरिकांना आजार झाल्याबाबतचे डॉक्टर तपासणीचे प्रमाणपत्र.
4) मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण समिती बैठक दिनांक 04.01.2018

उपरोक्त विषयांकित प्रकरणात जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक 11.12.2017 रोजी झालेल्या चर्चेमध्ये एमआयडी हद्दीमधील कारखाने केमिकल झोन नसतांना केमिकल कारखाने थाटले गेल्याने केमिकल कारखाने रात्री/अपरात्री उघडयावर दूषीत पाणी सांडल्याम वाळुज,पंढरपूर,रांजणगाव,घाणेगाव,जोगश्वरी,कुंभेफळ,शेंद्रा,चित्तेगाव,बिडकीन,ईसारवाडीसह परिसरातील अनेक गावांचे पाणी दुषीत झालेले असल्य विषय स्थायी समितीत चर्चीला गेलेला आहे.**शेंद्रा एमआयडीसी मधील कुंभेफळ ग्रामपंचायत हद्दीतील रॅडीको कारखान्यामुळे** भागातील पा तलाव,विहीरी,हातपंपाचे पाणी दुषीत होत असल्याने गावपरिसरातील नागरिकांना विविध प्रकारचे आजार जडले असल्याचे तसेच पिण्याचा पाण्याचा प्र भेडसावत असल्याने आपण काय कार्यवाही केली. असा प्रश्न जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीत चर्चीला गेलेला आहे.त्या अनुसार संदर्भ क्रमांक 1 नुस कळविण्यात आलेले आहे.संदर्भ क्रमांक 2 नुसार प्रादेशिक अधिकारी श्री.सुकेंवार साहेब,उपप्रादेशिक अधिकारी श्री.कदम साहेब यांची प्रत्यक्ष भेट घे विषयांकित प्रकरणात वस्तुनिष्ठ माहिती संदर्भात चर्चा केली.संदर्भ क्रमांक 3 नुसार श्री.रमेश गायकवाड,जि.प.सदस्य, यांनी **शेंद्रा एमआयडीसी मधी कुंभेफळ ग्रामपंचायत हद्दीतील रॅडीको कारखान्यामुळे परिसरातील नागरिक दुषीत पाणी प्यालयाने विविध आजार झालेले असल्याचे डॉक तपासणीचे प्रमाणपत्र पुराव्यासह सादर केलेले आहे.**संदर्भ क्रमांक 4 नुसार मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण समिती बैठक दिन 04.01.2018 रोजी झालेल्या बैठकीत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुध्दा या विषयावर सविस्तर चर्चा करुन संबंधित कारखान्यावर नियमाप्रमा कार्यवाही करण्यासंदर्भात सूचविले आहे.

त्या अनुषंगाने आपणास सचीत करण्यात येते की जिल्हा परिषदेची **स्थायी समिती सभा दिनांक** 12.01.2018 **रोजी होणार आहे.**सदरी सभेमध्ये विषयांकित प्रकरणात चर्चा होणार आहे,त्या अनुषंगाने आपण विषयांकित प्रकरणात आपण प्रादेशिकअधिकारी,महाराष्ट्रप्रदूषण नियंत्रण मंड या कार्यालयाशी संपर्क साधून कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

O/c प्रविअ वि.अ.(पं) स.ग.वि.अ.

(वासुदेव सोळंके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी(पं)
जिल्हा परिषद,औरंगाबाद.

**प्रतिलीपी**:- 1)मा.अध्यक्षा,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना सविनय माहितीस्तव.
2) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना सविनय माहितीस्तव.
3)मा.जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना सविनय माहितीस्तव.
4).जिल्हा आरोग्य अधिकारी,आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना कळविण्यात येते की सन्माननीय जिल्हा परिषद सदस्य,श्री.रमेश गायकवाड, जि.प.सदस्य, यांनी रॅडीको कारखान्यामुळे शेंद्रा एम.आय.डी.सी. तील विविध गावातील नागरिकांना आजार झाल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे,सदरील प्रमाणपत्र यासोबत देण्यात येउन नियमाप्रमाणे आपल्या कार्यालयामार्फत योग्य ती कार्यवाही करावी.
5) व्यवस्थापक,रॅडीको कंपनी लिमीटेड,शेंद्रा एमआयडीसी,औरंगाबाद यांना सूचीत करण्यात येते की परिसरातील विहीरीचे,पाझर तलावाचे पाणी दुषीत होणार नाही त्यानुसार आपल्या कारखान्याची रासायनीक प्रकिये दवारे सोडलेले दूषीत सांडपाण्याबाबत ची विल्हेवाट लावण्याबाबत दक्षता घ्यावी.
6) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषन नियंत्रण मंडळ, प्लॉट नंबर अे- 4/1,दैनिक लोकपत्राच्या मागे,चिकलठाण, औद्योगिक क्षेत्र,जालना रोड. औरंगाबाद यांना उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
7)श्री.रमेश गायकवाड,जि.प.सदस्य,गट क्रमांक 51,पंढरपूर,ता.जि.औरंगाबाद यांना माहितीस्तव.

11/1/2018
आरोग्य विभाग,
जि.प.औरंगाबाद

O/c प्रविअ वि.अ.(पं) स.ग.वि.अ.

(वासुदेव सोळंके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी(पं)
जिल्हा परिषद,औरंगाबाद.

Issue
Date 11.1.18

E20-RU-B

14

अतितात्काळ
प्रदुषण नियंत्रण प्राधान्य

0480
जा.क्र.जि.प.औ./ 2 पंचायत/ कावी/2018/126.
कार्यालय जिल्हा परिषद,औरंगाबाद.
दिनांक:- 24.01.2018. 131

प्रति,

प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडह,
प्लॉट नंबर अं-4/1,
दैनिक लोकपत्राच्या मागे,
चिकलठाणा,औद्योगिक क्षेत्र,
जालना रोड,औरंगाबाद.

**विषय:- रॅडीको कारखान्यात प्लान्टवरील झालेली रासायनीक प्रक्रियेनंतर उघडयावर सोडलेल्या दुषीत सांडपाण्यामुळे प्रदुषण होउन 200 लोक विविध रोगाने आजारी पडले आणि दोन माणसांचे मृत्यू झाल्यामुळे रॅडीको कंपनीवर कार्यवाही करणे बाबत.**

**संदर्भ:**-1) जिल्हा परिषद,स्थायी समिती सभा दिनांक 14.12.2017 ठराव क्रमांक 68 संमत झाल्यानुसार.
2) या कार्यालयाचे समक्रमांकित पत्र दिनांक 23.10.2017,स्मरण पत्र क्रमांक -1 दिनांक 8.12.2017, व प्रत्यक्ष आपल्या कार्यालयास भेट दिनांक 6.12.2017 आणि स्मरण पत्र दिनांक 10.01.2018

उपरोक्त विषयांकित प्रकरणात जिल्हा परिषद,औरंगाबाद स्थायी समिती सभा दिनांक 14.12.2017 ठराव क्रमांक 68 नुसार संमत झाल्यानुसार सन्माननीय जिल्हा परिषद सदस्य श्री.रमेश गायकवाड यांनी असे सूचविले की रॅडीको कारखान्यात प्लान्टवरील झालेली रासायनीक प्रक्रियेनंतर उघडयावर सोडलेल्या दुषीत सांडपाण्यामुळे प्रदुषण होउन 200 लोक विविध रोगाने आजारी पडले आणि दोन माणसांचे मृत्यू झाल्यामुळे रॅडीको कंपनीवर कार्यवाही करावी . तसेच आपल्या कार्यालयाने जर कार्यवाही केली नाही तर हा विषय महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावा नाही तर या संदर्भात हायकोर्टात याचीका दाखल करणार असल्याबाबतचा ठराव जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती मध्ये ठराव संमत झालेला आहे.सदरील ठरावाला सन्माननीय जिल्हा परिषद सदस्य श्री.अविनाश गालांडे यांनी अनुमोदन दिले.तसेच संदर्भ क्रमांक 2 नुसार आपणास वारंवार कळवून व प्रत्यक्ष भेटुन सुध्दा अदयांप पर्यत आपण संबंधित कारखान्याविरूध्द उघडयावर सोडलेल्या दुषीत सांडपाण्याबाबत आपल्या कार्यालयामार्फत कोणतीच कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की जिल्हा परिषद,औरंगाबाद स्थायी समिती सभा दिनांक 14.12.2017

(P.T.O.)

15

ठराव क्रमांक 68 नुसार रॅडीको कारखान्यावर आपल्या कार्यालयामार्फत नियमानुसार योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.सुलभ संदर्भाकरिता जिल्हा परिषद,औरंगाबाद स्थायी समिती सभा दिनांक 14.12.2017 ठराव क्रमांक 68 ची छायांकित प्रत एकूण पाने 23 या सोबत देण्यात येते.

**सोबत**:- वरीलप्रमाणे.

(वासुदेव सोळंके)

OK ग्रावि‌अ वि.अ.(पंचायत) स.ग.वि.अ. उप मुख्य कार्यकारी अधिकारी(पं)
जिल्हा परिषद,औरंगाबाद.

**प्रतिलीपी**:- 1) मा.जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव आणि सविनय माहितीस्तव.
2) मा.अध्यक्षा,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना सविनय माहितीस्तव.
3) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.औरंगाबाद यांना सविनय माहितीस्तव.
4) श्री.रमेश गायकवाड,जिल्हा परिषद सदस्य,गट क्रमांक 51,पंढरपूर ता.जि.औरंगाबाद यांना माहितीस्तव.
5)श्री.अविनाश पाटील गलांडे,जिल्हा परिषद सदस्य,मु.पो.महालगाव ता.वैजापूर जि.औरंगाबाद यांना माहितीस्तव.

(वासुदेव सोळंके)

OK ग्रावि‌अ वि.अ.(पंचायत) स.ग.वि.अ. उप मुख्य कार्यकारी अधिकारी(पं)
जिल्हा परिषद,औरंगाबाद.

Issued 9
Date 29.1.18

## दिनांक १४.१२.२०१७ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत

जिल्हा परिषद, औरंगाबाद स्थायी समितीची सभा मा.श्रीमती. ॲड देवयानी कृष्णा पाटील डोणगांवकर, सभापती तथा अध्यक्ष, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतरावराव चव्हाण सभागृह येथे दिनांक १४.१२.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली. सभेस हजेरी पटाच्या रकाना क्रमांक २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

सभेचे पदसिध्द सचिव यांनी मा.अध्यक्ष व प्रशासनाच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करुन कोरमपुर्तीची खात्री झाल्यानंतर मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

सचिव :- दिनांक १६.११.२०१७ रोजी झालेल्या स्थायी समिती सभे मध्ये पारित झालेल्या ठरावाचे अनुपालन अवलोकनार्थ सादर केले.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- विषय क्र.१ हा मागील सभेचे इतिवृत्तांत मंजूर करण्याबाबतचा आहे.सभेमध्ये आपण बरेच ठराव घेतो परंतु त्यानुसार कार्यवाही होत नाही. ग्राम सेवकाच्या बाबतीत ठराव घेण्यात आला होता साधारणत: ३-४ महिन्यापूर्वी स्थायी समिती सभेमध्ये ठराव पारीत करण्यात आला होता की, ९१ माध्यमिक शिक्षक अतिरिक्त ठरले होते व ४२० ते ४२५ प्राथमिक शिक्षक कमी आहेत अतिरिक्त ठरलेल्या ९१ माध्यमिक शिक्षकांना प्राथमिक शिक्षकाच्या पदावर तात्पुरत्या स्वरुपात देण्यात यावे परंतु ३-४ महिने झाले तरी कार्यवाही होत नाही. आम्ही येथे नुसते विषय मंजूर करायचे का? ९१ शिक्षकांच्या बाबतीत काय झाले.

स.स.श्री.मधुकर वालतुरे:- मागील ३ महिन्या पूर्वी हा प्रश्न मीच उपस्थित केला होता. असंख्य ठिकाणी शिक्षकांची कमतरता आहे. शाळेला कुलुप लावले जातात. एकीकडे ही परिस्थिती आहे, एकीकडे शिक्षक अतिरिक्त आहेत.आमचे असे म्हणने आहे की, अतिरिक्त शिक्षकांना जेथे गरज आहे तेथे पाठवा. परंतु ४-५ महिनें होवून देखील शिक्षण विभागाने काहीच कार्यवाही केली नाही.

मा.अध्यक्ष :- आपली परवा बदलीची प्रक्रिया झाली त्यामुळे हे काम तात्पुरते पेंडींग राहीले.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- शासनाचे असे काही परिपत्रक आहे का की, हया लोकांना देवू नका म्हणून.

मा.अध्यक्षः- मा.विभागीय आयुक्तांकडे पत्र दिले, या बाबत मार्गदर्शन मागितले आहे, मार्गदर्शन अद्याप आले नाही.

स.स.श्री.अविनाश गलांडे :-या बाबतची फाईल मागवा.

मा.अध्यक्ष :- फाईल मागांवते.

स.स.श्री.मधुकर वालतुरे :- प्रतिनियुक्तीसाठी आपल्याला परवानगी घ्यावी लागते हे मला माहित आहे. परंतु आपल्याला तात्पुरते त्यांना द्यायचे आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे :-आम्ही मिटींग मध्ये सुचना करतो त्याला काही महत्व नाही का. असे जर असेल तर आम्हाला मिटींगला का बोलावता. पुढच्या मिटींग पासुन आम्हाला बोलवू नका. प्रत्येक २ दिवसा आड एका शाळेला कुलुप लागते आणी तुम्ही विभागीय आयुक्तांचे मार्गदर्शन मागवता. कोणी सांगितले तुम्हाला विभागीय आयुक्तांचे मार्गदर्शन घ्यायला. येथे अध्यक्ष महत्वाचे आहे त्यांचे आदेश आपण पाळले पाहिजे.विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव पाठवायची काय गरज आहे. विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव का पाठविला.विभागीय आयुक्तांकडून १२ महिने मार्गदर्शन आले नाही तर आपण ते तसेच ठेवायचे का? कमीशनर, कलेक्टरला विचारता, शिक्षण विभाग विभागीय आयुक्त व हायकोर्टच्या निर्देशानुसार चालते का? जर आमच्या बोलण्यावर काहीच होत नसेल तर मग आमचा येथे काय उपयोग, आम्हाला बैठकीला कशाला बोलावता. अध्यक्ष हे हायर अँथोरिटी आहे. त्यांचे आदेशाप्रमाणे विभागाने काम करायला पाहीजे. परवा हस्ता तालुका कन्नड येथे शिक्षक नसल्याने शाळेला कुलुप लागले.

स.स.श्री.मधुकर वालतुरे:- आदरणीय सी.ई.ओ. साहेब, आपण मा.अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली शाळा तपासणीचे काम सुरु केले ही चांगली बाब आहे.ग्रामिण भागात आपण चक्कर मारा शाळा मध्ये ३-३, ४-४ जागा रिक्त आहेत. रोडवरील शाळेचे शिक्षक काढायचे व ग्रामिण भागातील शाळेत टाकायचे. आपल्याकडे असंख्य शिक्षक अतिरिक्त आहेत आपण त्याची आकडेवारी काढलेली नाही, त्याची आकडेवारी काढून घ्या व अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करा.

स.स.श्री.अविनाश गलांडे :-वैजापूरचे अतिरिक्त शिक्षक काढा व सोयगावला द्या असे आम्ही म्हणत नाही जिथले शिक्षक तिथेच द्या, तात्पुरती व्यवस्था करा असे आमचे म्हणने आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- शिक्षण विभागाने शिक्षकांच्या समायोजनाची संचिका सादर केली, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा.विभागीय आयुक्त यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे असे लिहलेले आहे. रेग्युलर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी आल्यावर आपण या बाबत निर्णय घेवू. सदरील प्रकरणात शिक्षण उपसंचालक किंवा शासनाचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

स.स.श्री.मधुकर वालतुरे:- अशा अनेक शाळा आहेत की ६० ते ७० टक्के शाळेमध्ये सायन्स व गणित विषयाचे शिक्षक नाही. त्यामुळे जे शिक्षक अतिरिक्त आहेत त्यांना तात्पुरते प्रतिनियुक्तीने देण्यास हरकत नाही.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी:- अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करता येईल तथापि रेग्युलर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी आल्यावर या बाबत आपण निर्णय घेवू.

18



स.स.श्री.अविनाश गलांडे :-शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी या बाबत पाठपुरावा केला का. किती वेळा मा.विभागीय आयुक्तांना भेटले सांगा.

शिक्षणाधिकारी प्राथ.:- होय, पाठपुरावा केला, दोन वेळा विभागीय आयुक्त कार्यालयास भेट दिली, मार्गदर्शन अप्राप्त आहे. आज पुन्हा मिटींग झाल्यावर मी विभागीय आयुक्त कार्यालयास जाणार आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे :-आम्ही जे ठराव मांडतो त्यावर कार्यवाही होत नाही. आम्ही नुसतं मागच्या बैठकीच्या प्रोसिडींगला मंजूरी द्यायची म्हणजे तुम्ही मोकळे. मी जर का विषय काढला नसता तर काहीच कार्यवाही झाली नसती.

मा.अध्यक्षः- शिक्षण विभागाने या विषयास सिरीयसली घ्यावे व पाठपुरावा करुन मार्गदर्शन प्राप्त करुन घ्यावे.

सचिव :- ठराव क्र.५६ चे अनुपालन सादर केले.

स.स.श्री.रमेश गायकवाड:- रेडीको कंपनीबाबत मागच्या स्थायी समिती सभे मध्ये सविस्तर चर्चा झालेली आहे. मी असे म्हटलो होतो की, जर रेडिको कंपनी चालु राहीली तर गावचे गाव आजारी पडेल. दुषीत पाण्यामुळे जवळपास २०० लोक आजारी झाले, ५० लोकांना किडनी स्टोन झाले व १५० लोकांना अर्धांगवायू व त्वचा रोग झाले. दुषित पाण्याची चौकशी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केली व रिपोर्ट सादर केला. डॉ.दाते यांनी सांगितले की, तेथे आजारी कोणीच नाही, कोणीही पेशंट नाही असा खोटा रिपोर्ट दिला. दुषीत पाण्यामुळे आमच्या शेतक-यांची जमीन नष्ट झाली. रेडीको कंपनीला प्रशासन व राज्य शासन पाठीशी घालत आहे हा गंभीर विषय आहे. २ माणसाचा मुत्यु झालेला आहे, २०० लोक आजारी पडलेले आहेत, शेतक-यांचे पिक नष्ट होत आहेत, पोल्युशन बोर्ड याकडे लक्ष देत नाही, हा विषय शासनाकडे घेवून जावे. रेडीको कंपनी बंद झाली पाहीजे. पोल्युशन बोर्डाने योग्य ती कार्यवाही केली नाही. डॉ.दाते यांनी खोटा रिपोर्ट दिला म्हणून त्यांना निलंबीत केले पाहिजे तोपर्यंत पुढचा विषय होवू देणार नाही, अशी या सभागृहाची भावना आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे :-जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कबुल केले आहे की, लोक आजारी आहेत. बरेच लोक किडनी स्टोनच्या त्रासाने, त्वचेच्या आजाराने व इतर आजाराने आजारी झाल्याचे मान्य केले आहे. रेडीको ही कंपनी जर अशीच सुरु राहीली तर वेगवेगळया आजाराने माणसे व जनावरे आजारी पडतील.

उप मु.का.अ.(पंचायत):- मी स्वतः दिनांक ६.१२.२०१७ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ या कार्यालयास भेट दिली. तेथील प्रादेशिक अधिकारी श्री.सुंकेवार व उपप्रादेशिक अधिकारी श्री.कदम यांच्याशी चर्चा केली. त्यांना सांगितले की, स्थायी समिती सभेत उपस्थित राहून सविस्तर अहवाल सादर करावा. पोल्युशन बोर्डचे प्रतिनिधी आजच्या बैठकीस आलेले आहेत.

मा.अध्यक्ष :- पोल्युशन बोर्डाचे प्रतिनिधींनी सांगावे.

डॉ.कल्याणी झाडपिळे, क्षेत्रीय अधिकारी :- दिनांक ३.११.२०१७ रोजी ग्रामसंसद कार्यालय, कुंभेफळ येथे सदर उद्योगाचे सांडपाणी कुंभेफळ नाल्यामध्ये रोखणेकरिता करावयाच्या उपाययोजने बाबत महसुल विभागाचे अधिकारी, कुंभेफळ ग्राम संस्थेचे पदाधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व सदर परिसरातील नागरिकांची बैठक घेण्यात आली.त्यानंतर दिनांक ७.११.२०१७ रोजी सदर उद्योगांचे प्रतिनिधींची सुनावणी घेवुन दिनांक ७.११.२०१७ च्या पत्रान्वये अंतिम निर्देश पारित करण्यात आले व सदरील उद्योगा कडून रुपये १० लाखाची बँक हमी घेण्यात आली.गावातील विहीर स्वच्छ करुन देण्या बाबत सुचना दिलेल्या आहेत. याबाबतचा अहवाल सुध्दा सादर केला आहे.

स.स.श्री.रमेश गायकवाड :- रेडीको कंपनीच्या पोल्युशन मुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले. २०० लोक आजरी पडले २ माणसांचा मुत्यु झाल्याने आपण कंपनीवर काय कार्यवाही करणार ते सांगा. एवढया मोठया प्रमाणावर लोक गंभीर आजारी असताना याबाबत दखल घेतली जात नाही. आमच्या दृष्टीने नागरीकांचे जीवन/आरोग्य महत्वाचे आहे. डॉ. दाते यांनी खोटा अहवाल दिला त्यांचेवर कारवाई झाली पाहिजे. त्यांचेवर कारवाई व्हावी असा मी या ठिकाणी ठराव मांडतो, तसेच पोल्युशन बोर्ड कंपनी बंद व्हावयास पाहिजे. जर कार्यवाही करत नसेल तर हा विषय महाराष्ट्र शासनाकडे पाठवावा नाही तर आम्ही या संदर्भात हायकोर्टात याचिका दाखल करणार आहोत. हा विषय सभागृहात मांडला पण सभागृह यावर काहीच कार्यवाही करत नाही. रेडीको कंपनी बंद झाली पाहिजे व खोटा अहवाल देणारे डॉ. दाते यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे हा ठराव मी या ठिकाणी मांडतो.

स.स.श्री.अविनाश गलांडे :-आताच स.स.श्री.रमेश गायकवाड साहेबांनी जो ठराव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. रेडीको कंपनी बंद करण्याचा प्रस्ताव त्वरीत पाठवावा.

**ठराव क्रमांक (६८):-** रेडीको कंपनीच्या पोल्युशनमुळे २०० लोक विविध रोगाने आजारी पडल्यामुळे आणि २ माणसांचा मुत्यु झाल्यामुळे पुढील योग्य ती कार्यवाही करण्याबाबत प्रदुषण मंडळास कळविण्यात यावे. व डॉ. दाते यांची चौकशी करुन कार्यवाही करण्यास सभागृहात ठराव पारीत करण्यात आला.

**सुचक :- स.स.**श्री.रमेश गायकवाड अनुमोदक:- स.स.श्री.अविनाश गलांडे

सचिव :- ठराव क्र.५७ चे अनुपालन अहवाल सादर केले.

स.स.श्री.मधुकर वालतुरे :- मागच्या सभेत मी स्वतः व इतर स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये ज्या माता/भगिनी या डिलेव्हरीसाठी येतात त्यांना गरम पाण्याची सुविधा मिळावयास पाहिजे याकरिता शुध्द सोलार पॅनल दिले होते. परंतु आता सर्वे केला असता बरेच सोलार पॅनेल बंद आहेत त्यामुळे प्रसुतीच्या वेळेस रुग्णांना गरम पाणी मिळत नाही या सोलार पॅनलचा रुग्णांना उपयोग होत नाही. दिनांक

२१.११.२०१७ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पत्र दिले होते की, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात किती सोलार पॅनल बसविण्यात आले होते, किती सोलार पॅनल सुरु आहेत व किती सोलार पॅनल बंद आहेत याची माहिती मागितली होती. परंतु एक महिन्याचा कालावधी उलटून देखील आरोग्य विभागाने माहिती दिली नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी या बाबत सांगावे.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- सन २०१५-१६ व २०१६-१७ च्या निधीतून ९५ सोलार पॅनल बसविण्यात आले. सोलार पॅनल इन्स्टॉल करण्या बाबतचा निधी गट विकास अधिकारी यांना देण्यात आला. इन्स्टॉलेशन करण्यात आल्याचे प्रमाणपत्रांच्या आधारे देयके देण्यात आली आहेत. स.सदस्यांच्या मागणीनुसार तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून माहिती मागविण्यात आली होती. अद्याप माहिती अप्राप्त आहे त्यामुळे सभागृहास माहिती देवू शकलो नाही.

स.स.श्री.मधुकर वालतुरे :- एक महिन्यामध्ये जिल्ह्यातून माहिती मिळत नाही, ही बाब योग्य नाही.

मा.उपाध्यक्ष :- मी सुध्दा २ महिन्या पूर्वी आरोग्य विभागाला माहिती मागितली होती. परंतु मलाही माहिती मिळाली नाही. जिल्हा आरोग्य अधिकारी हे कसल्याही प्रकारचे काम करत नाही. मी उद्याचे जि.प.सर्वसाधारण सभे मध्ये त्यांचे कामकाजा बाबतीत विषय ठेवणार आहे. आमच्या एका स.महिला सदस्यांचे पतीने त्यांना फोन केला होता. परंतु त्यांनी त्यांचा फोन पण घेतला नाही. त्यांची मनमानी चालू आहे.

स.स.श्री.मधुकर वालतुरे :- मी एक महिन्यापूर्वी माहिती देण्याबाबत पत्र दिले व मा.उपाध्यक्ष यांनी २ महिन्यापूर्वी माहिती मिळणे बाबत पत्र दिले तरी आरोग्य विभागा कडून माहिती मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. २-३ वेळेस स्मरणपत्र देवूनही माहिती मिळत नाही तर मा.सी.ई.ओ.साहेब आपण काय कार्यवाही करणार.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- संबंधिता विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करायला पाहिजे.

स.स.श्री.मधुकर वालतुरे :- ही सिरीयस बाब आहे, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी या कडे लक्ष द्यावे व माहिती द्यावी. शाळांमध्ये शिक्षकांचे डेप्युटेशनचा विषय आहे तर त्यासाठी मा.विभागीय आयुक्तांचे मार्गदर्शन मागविले जाते व जिल्हा आरोग्य अधिकारी हे परस्पर डेप्युटेशन करतात म्हणजे शिक्षण विभागाला वेगळा नियम व आरोग्य विभागाला वेगळा नियम आहे का?

स.स.श्री.पंकज ठोंबरे :- एन.आर.एच.एम.अंतर्गत उपकेंद्र बांधकामासाठी २५ लाख, ३० लाख, निधी देवून देखील कंत्राटदार काम करत नाही. कामात अनियमितता आहे आम्ही सदस्य बोलतो परंतु त्यावर कार्यवाही होत नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- संबंधित इंजिनियर यांना घेवून मी दौरा केला ते काम करण्यास तयार आहेत.

मा.सभापती, आरोग्य समिती :- ज्यांनी बांधकामात अनियमितता केली त्यांचेवर कार्यवाही करा.

मा.उपाध्यक्ष :- बांधकामा मध्ये अनियमितता केलेल्या अधिकारी , संबंधित इंजिनियर व कंत्राटदार याच्यावर नियमा प्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

स.स.श्री.पंकज ठेंबरे- एक इंजिनियर जिल्हा परिषदेचा आहे त्यांनी नोकरी सोडली आहे व तो पैठण पीडब्ल्यूडी मध्ये काम करीत आहे त्यांचेवर काय कारवाई करणार

स.स.श्री.मधुकर वालतुरे :- बांधकामामध्ये अनियमितता केलेल्या अधिकारी, इंजिनियर व कंत्राटदार यांच्यांवर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी सी.ई.ओ. साहेब या मध्ये आपण जर चौकशी केली तर जे.ई हेच कंत्राटदार आहेत असे दिसेल.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- मुल्यांकना पेक्षा जास्त पेमेंट केले असेल किंवा मुल्यांकन जास्तीचे केले असेल तर संबंधितावर कार्यवाही करता येईल.

स.स.श्री.मधुकर वालतुरे :- गेल्या ६ महिन्यामध्ये चार चौकशी समित्या नेमल्या परंतु एकाही चौकशी समितीचा अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आलेला नाही. चौकशी समिती मध्ये आमच्या पक्षाचे लोक घ्यायला पाहिजे तर ख-या अर्थाने चौकशी होईल. फक्त कागदावरच चौकशी समित्या नेमण्यांत आल्या का?. महिला बाल कल्याण, शालेय पोषण आहार, को.प.बं.गेट व बांधकाम याबाबत चौकशी करण्यासाठी चौकशी समित्या नेमण्यांत आलेल्या होत्या परंतू अद्यापी कोणत्याही चौकशी समितीचा अहवाल प्राप्त नाही. यासाठी विरोधी पक्षाचा सदस्य नेमावा.

मा.उपाध्यक्ष :- स.स.श्री.मधुकर वालतुरे यांना समितीमध्ये घेण्यात यावे.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- चौकशी समिती नेमल्या बाबतचे पत्र आजच द्या.

सचिव :- ठराव क्र.५८ चे अनुपालन सादर केले.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- शिक्षण विभागाच्या अपंग समावेशीत शिक्षक योजने अंतर्गत खाजगी माध्यमिक शाळेतील ११ बोगस शिक्षकांच्या दिलेल्या नियुक्त्यांची चौकशी करण्यासाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती व अहवाल ७ दिवसात देण्या बाबत सांगितले होते. आत्ता जवळपास एक महिना होत आला आहे. या बाबत काय झाले.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- सदरील प्रकरणात चौकशीच्या अनुषंगाने एक मिटींग झालेली आहे. संबंधित विभागाच्या संचिकांची तपासणी करण्यात आली ज्या शिक्षकांना नियुक्त्या देण्यात आल्या त्याची तपासणी करण्यात

आली. संबधित शाळेमधील विद्याथी संख्या व शिक्षण विभागाने जे आदेश काढले त्याची तपासणी करुन लवकरच अहवाल सादर करण्यात येईल.

स.स.श्री.अविनाश गलांडे:-तपासणीत काय आढळले ते सांगा. शिक्षण उपसंचालक यांच्या कडून या नियुक्त्या रद्य करण्या बाबतचे पत्र आले आहे हे खरे आहे का.?

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- शिक्षण उपसंचालक नाशिक यांचे पत्र आलेले आहे असे दिसुन येते.

स.स.श्री.अविनाश गलांडे:-मागच्या मिर्टींग मध्ये शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी मा.उच्च न्यायालयाचा आधार घेवून खुलासा केला होता व या प्रकरणामध्ये कंटेम्प्ट होईल असे म्हटले होते. आता शिक्षण उपसंचालक नाशिक यांनी या नियुक्त्या रद्य केल्या हे कसे.

शिक्षणाधिकारी प्राथ :- मा.अध्यक्ष मॅडम, मा.उप संचालक यांचे पत्र दिनांक १३.७.२०१७ चे आहे ते वेगळया विषयाचे आहे.अपंग एकात्मिक योजना आणि अपंग समावेशित योजना या दोन बाबी वेगवेगळया आहेत.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- शिक्षणाधिकारी प्राथ यांनी ११ शिक्षकांना चुकीच्या नियुक्त्या दिल्या त्या रद्य करण्या बाबत मा.अध्यक्षा यांनी सुचना दिल्या होत्या. परंतु तुम्ही असे म्हटले होते की, या मध्ये कंटेम्प्ट होईल. मी ज्या नियुक्त्या केल्या त्या योग्य आहेत. आता हया नियुक्त्या रद्य करण्या बाबत शिक्षण उपसंचालक, नाशिक यांनी पत्र दिले आहे.

शिक्षणाधिकारी प्राथ :- मा.शिक्षण उपसंचालक यांनी दिलेले पत्र हे वेगळे आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- नियुक्त्या दिलेले शिक्षक हे शाळेवर जात आहेत, कसाबखेडा येथील शाळेवरील हजेरी मस्टरवर त्या शिक्षकांच्या सहया आहेत. कसाबखेडा शाळेचे मस्टर मागवा व पहा.

शिक्षणाधिकारी प्राथ :- मी सर्व नियुक्त्यांना स्थगिती दिली आहे व या बाबतचे आदेश निर्गमित केले आहे.

स.स.श्री.मधुकर वालतुरे:- स्थगिती आदेश दिल्यामुळे तो शिक्षक म्हणून त्या शाळेवर काम करु शकत नाही तरी परंतू सदर व्यक्ती शिक्षक म्हणून सहया करतो म्हणजे हा ४२० पणा आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- गट शिक्षणाधिकारी यांना फोन करुन माहिती घ्यावी.

मा.अध्यक्ष :- गट शिक्षणाधिकारी यांना फोन करुन 11 शिक्षक हे शाळेवर काम करतात का? याची माहिती विचारावी.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी स्थगिती आदेश काढले हे बरोबर आहे, गट शिक्षणाधिकारी यांनी त्यानुसार कार्यवाही केली नसल्यास या बाबत संबंधित शाळेचे मुख्याध्यापकांचे खुलासे घ्यावे.

स.स.श्री.मधुकर वालतुरे :- एक एक महिना शाळेला ऑर्डर मिळत नाही का?

शिक्षणाधिकारी प्राथ.:- आम्ही ऑर्डर निर्गमित केले त्याच्या पोहोच पावत्या आहेत.गट शिक्षणाधिकारी मार्फत ऑर्डर पोहोचवले व २-३ शाळांना मी स्वतः फोन केले.

मा.अध्यक्षा:- शिक्षक ॲक्च्युअल शाळेवर जातात का? याची माहिती घेण्यात यावी.

स.स.श्री.अविनाश गलांडे:-शिक्षणाधिकारी प्राथमिक हे चुकीचे काम करतात त्यांनी कामकाजात सुधारणा करावी.

मा.अध्यक्ष :- शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी विभागाचे कामकाजा कडे लक्ष द्यावे व कामात सुधारणा करावी, जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांची गळती होत आहे, आपल्या ऑलरेडी त्रुटया आहेत त्यात आणखी भर पाडू नका.

मा.उपाध्यक्ष :- मुलांना वाचता येत नाही ही शरमेची बाब आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- ११ शिक्षकांच्या नेमणुका आपल्या जिल्हयात कशामुळे झाल्या?

शिक्षणाधिकारी प्राथ.:- मा.विभागीय आयुक्त यांनी जटवाडा शाळेला अचानक भेट दिली, त्यावेळी शाळेतील मुख्याध्यापक व ४ शिक्षक गैरहजर होते. त्यांनी विद्यार्थ्योची परिक्षा घेतली असता शाळेतील ४ थी व ७ वी च्या विद्यार्थ्यांना वाचन करता आले नाही.

स.स.श्री.अविनाश गलांडे:-या बाबत तुमचे काय म्हणने आहे.

शिक्षणाधिकारी प्राथ.:- सर्वच शाळा मध्ये अशी परिस्थिती नाही, काही ठिकाणी चांगली परिस्थती आहे. मा.विभागीय आयुक्त यांच्या सुचने नुसार शाळांची तपासणी करण्यासाठी तपासणी पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तपासणी पथकांचे अहवाल प्राप्त होताच त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. गट शिक्षणाधिकारी यांना सुध्दा शाळांना भेटी देण्याबाबत सांगितलेले आहे. काही ठिकाणी मी सुध्दा भेटी दिल्यात. लासुर स्टेशच्या शाळेला मी भेट दिली आहे.

मा.अध्यक्षा - लासुरस्टेशनला भेट दिली तेथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक परिस्थिती कशी काय आहे.

शिक्षणाधिकारी प्राथ.:- तेथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक परिस्थिती फारशी चांगली नाही.

स.स.श्री.अविनाश गलांडे:-जिल्हया मध्ये ७० ते ८० टक्के विद्यार्थ्यांना वाचता येत नाही. आपल्या जिल्हया मध्ये एकूण किती शिक्षक आहेत व त्यांचे वेतनावर किती खर्च होतो ते सांगा.

शिक्षणाधिकारी प्राथ.:- जिल्हयामध्ये साधारणतः ९३६० शिक्षक आहे व त्यांचे वेतनावर ३ ते ४ कोटी रुपये खर्च होतो.

मा.सभापती, म.बा.क.समिती :- वेरुळ मध्ये तर ६ महिन्या पासुन शिक्षक नाही.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- ३ ते ४ कोटी रुपये शिक्षकांच्या वेतनावर खर्च होतो परंतु मुलांना वाचना येत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

शिक्षणाधिकारी प्राथ.:- आता यामध्ये सुधारण होईल, कारण आपण शिक्षकांना सुचना दिलेल्या आहेत की, जर शिक्षक पंचायत समिती, जिल्हा परिषद अथवा इकडे तिकडे फिरतांना दिसुन आले तर त्यांच्या विरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- आम्हाला कार्यवाही नको, प्रगती दाखवा. तुमच्या बोलण्यावर आमचा विश्वास नाही. विद्यार्थ्यांना वाचत येत नाही या मध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. मुलांना वाचता येणे आवश्यक आहे.

मा.उपाध्यक्ष:- मी स्वतः काही शाळा मध्ये पाहिले, शिक्षक व विद्यार्थी मोबाईलवर बोलत असतात.मुलांना शाळेत मोबाईल आणण्यावर बंदी घातली पाहिजे.यासाठी कडक नियम करायला पाहिजे. अध्यक्ष ताई या साठी आपण सर्व गट शिक्षणाधिकारी यांची बैठक बोलवावी.

शिक्षणाधिकारी प्राथ.- शाळा तपासणीचा कार्यक्रम लावला आहे ज्या शिक्षकाचे काम चांगले नसेल त्यांचेवर आपण कारवाई करु. येत्या ३-४ महिन्यात शैक्षणिक प्रगती दिसुन येईल. वाचन विकास शिक्षण उपक्रम १०० दिवसांचा उपक्रम घेतला आहे. याबाबत प्रशिक्षणही घेतले आहे. सर्व तालुक्यात हा उपक्रम राबविला जात आहे. त्यामुळे शैक्षणिक प्रगती व सुधारण होईल.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- ११ शिक्षकांच्या नियुक्तीबाबतचा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा अहवाल कधी सादर होणार

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी:- एक आठवडयामध्ये अहवाल नियमित मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करण्यांत येईल.

स.स.श्री.मधुकर वालतुरे- मा.विभागीय आयुक्त यांनी सूचना दिल्या म्हणून आपण शाळेच्या तपासण्या लावल्या. खरे तर हे काम शिक्षण विभागाने करावयास पाहिजे. शिक्षण विभागाने याकडे लक्ष द्यावयास पाहिजे होते. तपासणी पथके नुमते शिक्षकांच्या बाबतीतच नेमण्यांत आले, आरोग्य विभाग, महिला बाल कल्याण विभाग व इतर सर्व विभागाच्या बाबतीतही तपासणी पथके नेमण्यात आली पाहीजे, आरोग्य विभागात कर्मचारी ४-४ दिवस ८-८ दिवस येत नाही तपासणी पथके नेमून गैरहजर राहणा-या विरुध्द कार्यवाही केली पाहीजे.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- ११ शिक्षकांच्या नियुक्ती बाबतची माहिती देण्या संबंधी पत्र दिले होते त्याचे उत्तर मिळाले नाही.

सचिव :- उत्तर तयार आहे, पत्र देते. तसेच आपण दिनांक ११.१२.२०१७ रोजी पंचायत राज समितीच्या खर्चा बाबतची माहिती मागितली होती ती पण तयार आहे.

सचिव :- ठराव क्र.५९ चे अनुपालन सादर केले.

स.स.श्री.रमेश गायकवाड :- ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार जिल्हा परिषदेतील वर्ग ३ व ४ कर्मचा-यांचे नियुक्तीचे अधिकार पूर्वी प्रमाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे ठेवण्या बाबतचा प्रस्ताव होता.

सचिव :- स्थायी समिती मध्ये झालेल्या ठरावानुसार शासनास पत्र पाठविले आहे. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांनी चर्चासत्र आयोजित करुन, १२ लोकांची निवड करावी ज्यामध्ये मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, नगराध्यक्ष, सरपंच यांना बोलवावे. या संदर्भात झालेल्या बैठकीत मी उपस्थित होते. ५ टॉपिकवर चर्चा झाली होती. याबाबत मला विनंती अशी करावयाची होती की, जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा, विषय समिती सभा आणि विभाग प्रमुखांना विनंती की, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडे जे अधिकार आहेत त्याची अंमलबजावणी करीत असताना राज्य शासनाचे अधिकार आणि आपले अधिकार यामध्ये जो संघर्ष आहे त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना काम करत असतांना धोरणात्मक निर्णयामध्ये बदल होणेबाबत जे ठराव शासनाकडे पाठविले जातात त्यामध्ये आपली भूमिका काय मांडता येईल तसेच वित्तीय अधिकाराचे बाबतीत कुठल्या प्रकारची कार्यतत्परता,कार्यपध्दती व कुठल्या प्रकारची स्वायत्ता असणे आवश्यक आहे याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडे सन्माननिय पदाधिकारी व सदस्य तसेच खाते प्रमुख यांनी टिप्पणी द्यावी म्हणजे त्याचे संकलन करुन त्यानुसार शासनास प्रस्ताव सादर करता येईल.

तद्नंतर ठराव क्र. ६०, ६१,६२,६३,६४,६५,६६,६७ चे अनुपालन सादर केले.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- ठराव क्र६७ बाबत कृषि विभागाने सविस्तर माहिती द्यावी. कृषि विकास अधिकारी हे बैठकीला नसतात मागील बैठकीला सुध्दा ते उपस्थित नव्हते.

कृषि विकास अधिकारी - मी दरवेळी बैठकीला उपस्थित असतो. मागच्या बैठकीच्या वेळी मा.मंत्री महोदय आलेले होते त्यामुळे बैठकीस उपस्थित नव्हतो.

स.स.श्री.अविनाश गलांडे - खते बी बियाणे अप्रमाणित असल्याबाबत काय कार्यवाही केली. कंपनीवर कारवाई केली जाते का?

कृषि विकास अधिकारी - बियाणांचे ६, खताचे ४, व किटकनाशकांचे ६६ विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत व १ परवाना रद्द करण्यांत आला आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- मुळ कंपन्यावर कार्यवाही करा ज्यांनी बोगस बियाणे दिले.

स.स.श्री. रमेश गायकवाड - मराठवाडयामध्ये बोंडअळीचे फार मोठे संकट पडले आहे. कापूस उत्पादकाचे ३० हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. गेल्या एक महिनाभरात १५०० शेतक-यांनी आत्महत्या केली आहे. राज्य सरकारला बोंडअळी संदर्भात कापूस संशोधन संस्थेमार्फत डिसेंबर २०१६ मध्ये बोंडअळी होउ शकते असा अहवाल पाठविला होता, परंतू त्यावर काहीच कार्यवाही केली नाही. मा.मुख्यमंत्री यांना भेटून यासंदर्भात पत्र दिले होते परंतू तरी सुध्दा शेतक-यांच्या हितासंबंधी, बोंडअळीबाबत काहीच कार्यवाही केली नाही. शेतकरी आत्महत्या करीत आहे, शेती नष्ट झाली आहे. जिल्हयात अवर्षणग्रस्त परिस्थिती आहे. पाणी उपलब्ध आहे परंतू शेतक-यांचे लाईट कनेक्शन कापण्यात आले आहे. एकीकडे बोंडअळीमुळे शेतकरी त्रस्त आहे व दुसरीकडे शेतक-यांचे लाईट कनेक्शन कट केले जात आहे अशा प्रकारे या शेतक-यांवर अन्याय होत आहे. कृषि विभागामार्फत पंचनामे झाले नाही. शेती नष्ट होत आहे असे असताना राज्य शासनाच्या कृषि व जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाकडून आतापर्यंत शेतक-यांना कोणताही दिलासा मिळाला नाही. त्यामुळे आमची अशी मागणी आहे की प्रतिएकर २५००० रुपये नुकसान भरपाई शेतक-यांना देण्यात यावी, तूर, मूग उडीद हे माल शेतक-यांकडून तात्काळ पुर्णतः खरेदी करावे. कृषी पंपाची ५० टक्के सबसिडी भरावी, शेतक-यांचे वीज बील पूर्णपणे माफ करावे. बी.टी. कंपन्यांवर गुन्हे दाखल करावे असा ठराव घ्यावा.

मा.उपाध्यक्ष - शेतक-यांचा विषय गंभीर आहे, सरसकट पंचनामे करण्या बाबत सुचना दिलेल्या आहेत.

कृषि विकास अधिकारी :- पंचनामे करण्याचे काम चालु आहे.

मा.उपाध्यक्ष :- जवळपास ८० टक्के कापसाचे नुकसान झाले आहे. सरसकट पंचनामे करणेबाबत आदेश दिलेले आहेत. कृषि अधिकारी व राज्य सरकारचे कृषि विभागाचे अधिकारी हे पंचनामे करण्याचे काम करीत आहे. करमाड येथे शेतक-यांचे कंपनीवर गुन्हे दाखल करण्याचे काम चालू आहे. ६६ परवाने रद्य करण्यांत आले आहे. कृषि विकास अधिकारी चांगले काम करीत आहे. बोंडअळीवर आळा घालण्यासाठी त्यांनी मेळावे घेतलेले आहेत. बोंडअळीसंदर्भात जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये तरतुद करावी लागणार आहे.

स.स.श्री.मधुकर वालतुरे- स.स.श्री.रमेश गायकवाड यांनी बोंडअळीसंदर्भात जो विषय मांडला तो अत्यंत महत्वाचा आहे. शासनाचे शेतक-यांना याबाबत मार्गदर्शन झाले पाहिजे. मा.मुख्यमंत्री यांनी सरसकट पंचनामे करण्याबाबत सांगितले आहे. बोंडअळीचा प्रारंभ झाला त्यावेळी मा.उपाध्यक्ष यांचे नेतृत्वाखाली त्यांचे अधिनस्त जे कर्मचारी मंडळी आहे त्यांनी शेतक-यांना मार्गदर्शन केले असते तर बरे झाले असते. शासनाची जबाबदारी आहे, जिल्हा परिषदेची जबाबदारी आहे आपली जबाबदारी आपण टाळू शकत नाही.

मा.उपाध्यक्ष - याबाबत सेमिनार घेतलेले आहेत.३ महिन्यापूर्वी सेमिनार झाले.

स.स.श्री.मधुकर वालतुरे:- शेतक-यांना जर न्याय द्यायचा असेल तर शासनाने/जिल्हा परिषदेने व पंचायत समितीने शेतक-यांना मार्गदर्शन केले पाहिजे.

मा.उपाध्यक्ष :- आपण या संदर्भाने सेमिनार घेतलेले आहे.

स.स.श्री.मधुकर वालतुरे - माझे नेवरगांवमध्ये असे सेमीनार किंवा मेळावे झालेले नाहीत. जिल्हा/तालुका पातळीवर असे सेमिनार झाले पाहिजेत.

मा.उपाध्यक्ष - कापूसतज्ञ व कृषि विकास अधिकारी यांनी २००० शेतक-यांना मार्गदर्शन केले आहे. जिल्हा परिषदेचा कृषि विभाग कोठेही कमी पडणार नाही. माझी अध्यक्ष महोदयांना अशी विनंती आहे की, बोंडअळीचा नायनाट करण्यासाठी आम्हाला बजेट देण्यांत यावे.

स.स.श्री.किशोर पवार- मा.उपाध्यक्ष यांनी सूचना मांडली तो योग्य आहे.तसेच बी.टी.वाणाबाबत सर्व समितीच्या वतीने ठराव घ्यावा की, दुकानदारांवर जी कारवाई झाली ती चुकीची झाली आहे. मुळात मुद्या असा आहे की, बी.टी.कंपनीला परवानगी कोणी दिली. ज्यांनी कोणी परवानगी दिली त्यांना जबाबदार धरण्यांत यावे. बी.टी.कंपनीवर गुन्हे दाखल करावेत दुकानदारांवर गुन्हा दाखल करु नये असा ठराव आजच्या सभेत घेण्यात यावा.

स.स.श्री.अविनाश गलांडे - या ठरावास माझेअनुमोदन आहे.

**ठराव क्रमांक (६९)** :- बोंडअळीच्या प्रादूर्भावामुळे शेतक-यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे यासाठी जबाबदार असणा-या बी. टी. कंपन्यांवर गुन्हे दाखल करण्यास व बियाणे विक्री दुकानदारांवर गुन्हे दाखल न करण्या बाबत तसेच प्रतिएकर २५ हजार रुपये नुकसान भरपाई शेतक-यांना देणे, तुर, मुग, उडीद हे माल शेतक-यांकडून तात्काळ खरेदी करणे व शेतक-यांचे वीज बील पूर्णपणे माफ करणे बाबत शासनास शिफारस करण्यासाठी सभागृहात ठराव पारीत करण्यांत आला.

**सूचक - स.स.श्री.किशोर पवार व स.स.श्री.रमेश गायकवाड अनुमोदन -स.स.श्री.अविनाश गलांडे**

कृषि विकास अधिकारी - बोंडआळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कृषि विभागा कडून केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सभागृहात सादर केला. या मध्ये शेतक-यांमध्ये जनजागृती करण्या संदर्भाने सेमिनार व मेळावे घेण्यात आल्याचे व शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात आल्याचे त्यांनी सादर केले

स.स.श्री.मधुकर वालतुरे- कृषी विकास अधिकारी यांचा खुप अभ्यास आहे, त्यांचा हा ज्ञान सर्वसामान्य शेतक-यां पर्यंत पोहोचवावा. या साठी कार्यशाळा, सेमिनार व मेळावे घ्यावे.

मा.उपाध्यक्ष :- सर्व गावामध्ये मेळावे घेण्यात यावे. पहिला मेळावा माझ्या गावात घ्यावा.

कृषि विकास अधिकारी :- पुढच्या दोन-अडीच महिन्यात आम्ही प्रत्येक गावात मेळावे घेणार आहोत.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- मेळावे २ राऊंड मध्ये घ्यावे.

कृषि विकास अधिकारी :- एप्रिल ते जून या दरम्यान एक राऊंड घेवू. पूर्ण जिल्हयामध्ये या बाबत मोहीम राबविण्यात येईल.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- शेतकरी अपप्राचाराला फार बळी पडतात, औषधी कंपन्यांच्या चुकीच्या व दिशाभुल करणाऱ्या प्रचाराला ते लवकर बळी पडतात त्यामुळे नुकसान होते हे थांबविणे सर्वाचे काम आहे त्यासाठी पर्यायी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ :-मुख्यमंत्री कृषि संजीवनी योजना-२०१७ बाबत बोलतांना सांगितले की, कृषी पंपाची रुपये ७२८ कोटीची थकबाकी व रुपये ६१३ कोटी व्याज अशी जिल्हयाची एकूण थकबाकी रुपये १३५० कोटीची आहे. मुळ थकबाकी वसुल करावयाची आहे त्यामुळे इन्टरेस्ट माफ होणार आहे, ५० टक्के निधी हा व्याजाचा आहे मुळ थकबाकी वसुली केल्यास व्याज माफ होणार आहे. ज्यांची मुळ थकबाकी रुपये ३० हजारा पेक्षा कमी असेल त्यांनी ५ हप्त्यात ही रक्कम भरावयाची आहे यासाठी दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. ज्यांची मुळ थकबाकी रुपये ३० हजारा पेक्षा जास्त आहे त्यांनी ही रक्कम १० हप्त्यात भरावयाची आहे, दर दिड महिन्यात हप्ता भरावयाचा आहे. तसेच ग्राहकांनी करंट वीज बील नियमितपणे भरावयाचा आहे या अटी पूर्ण केल्या नाही तर या योजनेचा लाभ त्यांना मिळणार नाही. जुन २०१७ चे वीज बील दिनांक १५.११.२०१७ पर्यंत भरणे आवश्यक आहे. या मध्ये अट शिथील करुन रुपये ३० हजार पेक्षा कमी थकबाकी असलेल्यांना ३ हजार व रुपये ३० हजारा पेक्षा जास्त थकबाकी असलेल्यांना ५ हजार रुपये भरुन या योजनेत सहभागी होता येईल. कृषी पंप ग्राहकांना याचा फायदा मिळू शकेल. आता पर्यंत ११ हजार ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. रुपये ११ कोटी जिल्हयामध्ये जमा झालेले आहे.

मा.उपाध्यक्ष :- पैसे भरलेल्यांना DP लवकर द्या.

स.स.श्री.मधुकर वालतुरे :- शासनाने जाहीर केलेली ही योजना चांगली आहे पण सध्या शेतकरी बोंडआळी मुळे परेशान आहेत, देण्यात आलेली वेळ मर्यादा ही कमी आहे त्यामुळे या मध्ये वेळ वाढवून मिळाले पाहीजे, ही शेतकऱ्यांची भावना आहे

अधिक्षक अभियंता,म.रा.वि.मं. :- आपल्या भावना आम्ही शासनास कळवू.

मा.अध्यक्ष :- आता नियमित विषय घ्यावे.

सचिव :- विषय पत्रिकेनुसार पहिला विषय हा मागील सभेच्या इतिवृत्तांतास कायम करण्या बाबतचा आहे.

विषय क्रमांक १ :- मागील स्थायी समिती सभा दिनांक १६.११.२०१७ चे इतिवृत्तांत कायम करणे

सचिव :- मागील सभेच्या इतिवृत्तांतास कायम करण्यास विनंती आहे.

मा.उपाध्यक्ष :- विषय मान्य

**ठराव क्रमांक (७०):-** मागील दिनांक १६.११.२०१७ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास सभागृहात मान्यता देण्यात आली.

**सुचक :-** स.स.श्री.अविनाश गलांडे    **अनुमोदक :-** स.स. श्री. रमेश गायकवाड

**विषय क्रमांक ( 2 ):-** जि.पं.स्थायी समिती सभे समोर विषय मंजुरीस्तव ठेवणे बाबत.मुदतबाहय देयकास जि.प.स्थायी समिती सभेची मंजुरी प्रदान करणे बाबत.

खालील कामाची व्यपगत ठेवी देयके तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने त्यास जिल्हा परिषद स्थायी समितीची मान्यता घेणेस्तव विषय जि.प.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | एजन्सी | रक्कम रुपये | प्रमाणक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | गुदमा ते सितानाईक तांडा रस्ता किमी 0/0 ते 0/900 ता.कन्नड | चे.अजंना म.स.स.पळशी ता.कन्नड | 7626/- | 76<br>14/08/2012 |
| 2 | जो.र.अंतापुर ते देभेगांव ता.कन्नड | चे.अजंना म.स.स.पळशी ता.कन्नड | 42138 | 75<br>14/08/2012 |

तेंव्हा वरील व्यपगत ठेवी मंजूरी प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत् समिती लेखांसहिता 1968 चे नियम 219 नुसार जि.प.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

**ठराव क्रमांक (७१):-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार १. गुदमा ते सितानाईक तांडा रस्ता कि.मी.०/० ते ०/९०० ता.कन्नड रक्कम रु. ७६२६/- आणि २. जो.र.अंतापूर ते देभेगांव ता.कन्नड ४२१३८/- या कामाच्या व्यपगत ठेवी देयकास तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २१९ नुसार प्रस्तावास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली.

**सुचक :-** स.स.श्री.अविनाश गलांडे    **अनुमोदक :-** स.स. श्री. किशोर पवार

**विषय क्रमांक ३:-** जिल्हा परिषदेच्या मासिक जमा खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत सन २०१७-१८

जिल्हा परिषद औरंगाबादच्या सन २०१७-१८ मधील माहे एप्रिल-१७ ते जुलै-२०१७ च्या जमा-खर्चास मा. अर्थ समितीची सभा दिनांक-०६/१०/२०१७ मधील ठराव क्रमांक (१९) अन्वये शिफारास प्रदान करण्यात आलेली आहे. या सोबत जिल्हा परिषदेच्या सन २०१७-१८ मधील माहे एप्रिल-२०१७ ते जुलै-२०१७ या महिन्यातील मासिक जमा-खर्चाचा मुख्य लेखाशिर्षनिहाय तपशिलाचे विवरणपत्र अवलोनास्तव सादर.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १०९ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ६० नुसार जिल्हा परिषदेच्या सन २०१७-१८ मधील माहे एप्रिल-२०१७ ते माहे जुलै-२०१७ मधील जमा-खर्चास मा.स्थायी समितीने मान्यता प्रदान करावी. हि विनंती.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी :- सन २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्षात ग्राम विकास विभागाने सी.एम.पी. व सेवार्थ प्रणाली लागू केली. सदरील उपक्रम राबविल्यामुळे वार्षिक लेखे सादर करण्यास विलंब झाला. विलंबा बाबत मा.अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली ती मी मान्य करतो. कम्पायलेशनच्या कामासाठी अपुरा कर्मचारी वृंद असल्यामुळे यास विलंब झालेला आहे, कम्पायलेशन शाखेचे कर्मचारी रात्रंदिवस काम करीत आहे. मी सुध्दा सध्या रात्री आठ साडेआठ वाजेपर्यंत बसून पेंडींग काम करतो.आता लेख्याचे काम पूर्ण झालेले असून आता माहे एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ या महिन्यातील मासिक जमा-खर्चाचा विषय मंजूरीस्तव सादर करण्यात आला आहे. समितीने त्यास मान्यता प्रदान करावी अशी विनंती आहे.

स.स.श्री.रमेश गायकवाड:- माहे एप्रिल १६ ते नोव्हेंबर १६ पंचायत समिती उपकरामध्ये असलेली शिल्लक ६५५१८४/- एवढी कमी दर्शविली आहे. आरंभीची शिल्लक रुपये ४३९६८१५५५ /- आहे. मागच्या बैठकीत हा विषय झाला नाही त्याचा मला १-२ दिवसात खुलासा द्यावा

मुख्य लेखा व वित्त अधिकारी :- ठिक आहे.

स.स.श्री.मधुकर वालतुरे:- विषय मंजूर

**ठराव क्रमांक (७२ ):-** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १०९ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ६० नुसार जिल्हा परिषदेच्या सन २०१७-१८ मधील माहे एप्रिल २०१७ ते माहे जुलै २०१७ या महिन्याच्या जमा खर्चास सभागृहात मान्यता देण्यात आली.

**सुचक :-** स.स.श्री.मधुकर वालतुरे **अनुमोदक:-** स.स.श्री. अविनाश गलांडे

मा.उपाध्यक्ष :- जे कर्मचारी चांगले काम करतात त्यांची नावे आम्हाला कळवा, आपण त्यांचा गौरव करु.

स.स.श्री.मधुकर वालतुरे :- उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांनी ग्राम सेवकांचा गौरव केला चांगली बाब आहे. आमच्या शिक्षकांना काही पुरस्कार आहे की नाही.

31

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- १९ डिसेंबरला आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार कार्यक्रम आहे.

सचिव :- मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय सादर करीत आहे.

**विषय क्रमांक ४ :-** श्री.अजय बाबुराव जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) जिल्हा परिषद औरंगाबाद यांची दि.२१/०२/२०१७ ते २१/०६/२०१७ (१२१) दिवसाची अर्जित रजा वैद्यकिय कारणास्तव मंजूर करणे बाबत

श्री.अजय बाबुराव जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) जिल्हा परिषद औरंगाबाद यांची दि.२१/०२/२०१७ ते २१/०६/२०१७ (१२१) दिवस ( चार महिने एक दिवस) वैद्यकिय कारणास्तव रजेवर राहिले आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे १०९(३) (घ) नुसार वर्ग १ व वर्ग-२ संवर्गातील अधिका-यांची ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधीची रजा मंजूर करण्याचे अधिकार स्थायी समितीस आहे. तरी संबंधिताची दि.२१/०२/२०१७ ते २१/०६/२०१७ (१२१) दिवस या कालावधीची रजा ही ३ महिन्यं पेक्षा जास्त असल्याने संबधिताचे शिल्लक रजा खात्यातून चार महिने एक दिवस अर्जित रजा वैद्यकिय कारणास्तव मंजूर करण्यासाठी स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- मान्यता आहे.

**ठराव क्रमांक (७३):-** श्री.अजय बाबुराव जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) जिल्हा परिषद औरंगाबाद यांची दि.२१/०२/२०१७ ते २१/०६/२०१७ (१२१) दिवस (चार महिने एक दिवस) याकालावधीची अर्जित रजा वैद्यकिय कारणास्तव मंजूर करण्यास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली.

**सुचक :-** स.स.श्री.अविनाश गलांडे **अनुमोदक :-** स.स.श्री.मधुकर वालतुरे

मा.सभापती, मबाक समिती :- आयसीडीएस डीपार्टमेंटला २ विस्तार अधिकारी पाहीजे, आपल्या जिल्हयामध्ये १४ बाल विकास प्रकल्प आहेत.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- सामान्य प्रशासन विभागा कडे दोन वेळा संचिका आली, तुम्ही त्यामध्ये त्रृटया काढल्या आहेत व संचिका परत केली.

उप मुकाअ मबाक :- स.स.श्री. गलांडे साहेब, आय.सी.डी.एस. विभागात फक्त ३ कर्मचारी काम करीत आहेत. पद भरण्या संबंधी मा.अध्यक्षाकडे या बाबत चर्चा झालेली आहे, मा.सभापती, यांनी वेळोवेळी हा विषय मांडला आहे,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी साप्रवि यांच्याशी पण चर्चा केली. पदे भरण्या बाबतची संचिका मुव्ह केलेली आहे व पाठपुरावा चालु आहे.

सचिव :- आकृतीबंध जो आहे त्यास ग्राम विकास विभागाची जो पर्यत मान्यता मिळत नाही तो पर्यंत हे पद भरता येत नाही.

उप मुकाअ (मबाक) :- ज्या जिल्हया मध्ये १० पेक्षा जास्त बाल विकास प्रकल्प आहेत त्या जिल्हयामध्ये महिला व बालकल्याण विभागास विस्तार अधिकारी सांख्येकीची २ पदे महिला बाल कल्याण विभागाकडून मंजूर आहेत. सध्यास्थितीत एक पद भरलेले आहे व एक पद निर्माण करुन भरावयाचे आहे या साठी ग्राम विकास विभागाचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिल्यानुसार सदरील पदास मंजुरी देणे व सदरील पद सेवार्थ प्रणाली मध्ये समाविष्ट करण्यास्तव पत्र पाठविण्यात येत आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- आपल्या अधिकारात जर होत असेल तर शासनाला पत्र का पाठवायचे. हा प्रश्न येथेच सोडवावा.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हा निर्णय घेतला असेल तर शासनाचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

सचिव :- संचिका मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे गेलेली आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे :- रिक्त पदे किती आहेत ते सांगा.

उप मुकाअ मबाक:- आय.सी.डी.एस. व म.बा.क. विभागामध्ये २ पदे कनिष्ठ सहाय्यकाची व १ पद विस्तार अधिकारीचे रिक्त आहे.

मा.सभापती, मबाक समिती :- महिला व बाल कल्याण विभागातील सगळेच रिक्त पदे भरुन टाका.

सचिव :- महिला व बाल कल्याण विभागास आणखी एक कर्मचारी देण्या बाबतची संचिका मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे सादर केलेली आहे.

उप मुकाअ मबाक:- श्रीमती जोशी हया जिल्हाधिकारी कार्यालयात काम करतात त्या सन २०१३ पासुन प्रतिनियुक्तीने जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत आहेत.

स.स.श्री.मधुकर वालतुरे:- जिल्हा परिषदेचे शिक्षक व इतर किती तरी कर्मचारी जिल्हाधिकारी /तहसिल कार्यालयात प्रतिनियुक्तीवर आहेत त्यांनी जिल्हा परिषदेचे काम केले पाहिजे, ते जिल्हा परिषदेचे पगार घेतात.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- श्रीमती. जोशी यांची प्रतिनियुक्ती रद्य करण्याबाबत आपण मा.जिल्हाधिकारी यांना पत्र दिलेले आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- अपंग शिक्षक समावेशनाच्या बाबतीत मी मुद्दे निहाय माहिती देण्या बाबतचे पत्र उप मुख्य कार्यकारी अधिकारी साप्रवि यांना दिले होते त्याचे दिलेले उत्तर बरोबर नाही. हे पत्र तुम्ही शिक्षण विभागास द्यायचे असते.

सचिव :- स.सदस्यांना विनंती आहे की, मी या समितीचे सदस्य आहे, मला वाटले म्हणून मी आपल्या पत्राचे उत्तर दिले.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- मी ११ तारखेला पत्र दिलेले आहे, मागे पंचायत राज समितीने जिल्हा परिषदेला भेट दिली त्यावेळी झालेल्या खर्चाची माहिती मागितली होती. PRC दौ-याचा खर्च शासन करते , मग जिल्हा परिषदेने हा खर्च स्वतःच्या उत्पन्नातून का केला. पत्र देवून ४ दिवस झाले ४ दिवसात झेरॉक्स काढता येत नाही का.

सचिव :- आताच माहितीची झेरॉक्स देते.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- मागे जिल्हा परिषदे मध्ये पंचायत राज समितीची बैठक झाली त्यावेळी समितीच्या खर्चासाठी तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी साप्रवि श्रीमती. छायादेवी शिसोदे यांच्या नावावर रुपये ५.०० लाखाचे अॅडव्हांस दिले. असे अग्रीम जि.प.उपकराच्या निधीतून देता येते का?. पंचायत राज समितीच्या दौ-यावर जवळपास रुपये १५.०० लाखाचा खर्च झाला आहे,आपल्याकडे तरतूद नाही तर खर्च कसा केला, याचे उत्तर द्यावे. रुपयें ५.०० लाख रुपये अग्रीम समितीची मान्यता न घेता दिला असे करता येते का? असा खर्च आपण का केला? खर्च केला असेल तर त्यास जि.प.सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली का? मा.अध्यक्ष महोदय, या बाबत आपण काय कार्यवाही करणार.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- शासनाच्या सुचना आहेत, PRC च्या दौ-या साठी असा खर्च करता येतो. परंतु त्यासाठी बजेटला तरतूद करावी लागते.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी या बाबत सांगावे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी :- ज्यावर्षी पंचायत राज समिती जिल्हा परिषदेस आली होती त्या वर्षात यासाठी बजेटला तरतूद नव्हती.

स.स.श्री.अविनाश गलांडे:-हा प्रकार योग्य आहे की, अयोग्य आहे हे सांगा.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी :- संचिका ही सामान्य प्रशासन विभागाची आहे, मी ही फाईल पाहीली नाही, मी फाईल पाहतो.

स.स.श्री.अविनाश गलांडे:-तुमच्या मर्जीने काम चालु आहे. जेथे तेथे नियम दाखवता येथे काही नियम नाही का?

स.स.श्री.अविनाश गलांडे:-आता या मध्ये पुढे काय करता येईल सांगावे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी :- सन २०१५-१६ मध्ये यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली नव्हती ही वस्तुस्थिती आहे.PRC च्या दौ-याचा खर्च भागविण्यासाठी नियम २१०( ब) नुसार अग्रीम मंजूर करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत त्यानुसार पंचायत राज समितीच्या दौ-याच्या खर्चासाठी रुपये ७.०० लाख अग्रीम मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्याअधिकारात मंजूर केला.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- संचिकेचे अवलोकन गेले असता ज्या वर्षी खर्च केला त्या वर्षी बजेटला तरतूद केली नव्हती. आता सन २०१७-१८ चे बजेट मध्ये पुर्नविनियोजना द्वारे तरतूद करण्यासाठी संचिका पुट-अप झाली आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे:- असे करता येते का?

मुख्य लेखा व वित्त अधिकारी :- त्या वर्षात या खर्चा साठी तरतूद केली नव्हती ती करावयास पाहीजे होती. पुढील वर्षी त्याचे समायोजन व्हावे म्हणून सन २०१७-१८ मध्ये बजेटला तरतूद करण्यासाठी संचिका मार्गस्त केली असेल. नियमाप्रमाणे अग्रीमाचे समायोजन हे ३ महिन्यात करणे आवश्यक आहे.

स.स.श्री.अविनाश गलांडे:-तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्या बाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करावा.

स.स.श्री.पंकज ठोंबरे :- औरंगाबाद जिल्हयातील नांदुर मधमेश्वर धरणाच्या पाण्याचा प्रश्न आहे. सन १९५८ मध्ये ११ TMC पाण्याचे आरक्षण करण्यात आले होते. दिनांक २१.१०.२०१७ च्या मंत्रीमंडळाच्या ठरावानुसार ६० TMC पाणी नाशीक धरणातून सन २०४१ वर्षा पर्यंत आरक्षित करण्यात आले त्यामुळे गंगापूर व वैजापूरवर अन्याय होत आहे. तसेच मा.मुख्यमंत्री यांनी २१ ऑगष्ट २०१७ ला शहापूर धरणातून ११३ गावांसाठी पाण्याचे आरक्षण केले होते. प्रत्येक धरणातील २५ टक्के पाणी आरक्षण करणे बाबत शासन निर्णय झालाआहे.यामुळे ६९ गावांचा पाण्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. पापयाच्या आरक्षणामुळे भविष्यात गंभीर पाणी टंचाई निर्माण होईल व शेतक-यांना पण प्रॉब्लेम येईल, शासनाला कळवा की असे करु नका, या वर निर्बंध घालण्यासाठी आजच्या बैठकीत ठराव घेवून तो शासनास पाठवावा.

35



स.स.मधुकर वालतुरे :- नांदूर मधमेश्वर पाण्याचे बाबतीत गंभीर विषय मांडलेला आहे. वैजापूर, गंगापूर हे तालुके अवर्षणग्रस्त आहे. पाण्याची तीव्र टंचाई आहे. पूर्वी शासनाने आपल्याला पाण्याचा जो कोटा ठरवून दिला आहे त्यामध्ये कुठलीही कपात करु नये, हक्काचे पाणी आम्हाला मिळायला पाहिजे. पाण्यात कपात न करता ज्या ज्या वेळी पाण्याची गरज असेल त्या त्या वेळी ते मिळावे असे जे मत मांडले आहे त्यास माझे पूर्णपणे अनुमोदन आहे.

स.स.श्री.रमेश गायकवाड - मराठवाडयामध्ये गोदावरीमध्ये असलेल्या उपलब्ध पाण्याच्या टक्केवारीनुसार गंगापूर वैजापूरला ११ TMC पाणी देणेबाबत शासन निर्णय झालेला आहे. समन्यायी पाणी वाटपाबाबत निर्णय झालेला आहे. नांदूर-मधमेश्वरचे पाणी कमी होउ नये असा ठराव घ्यावा व तो शासनाकडे पाठवावा.

**ठराव क्रमांक (७४)**:- औरंगाबाद जिल्हयातील नांदुर मधमेश्वर धरणातून सन १९५८ मध्ये ११ TMC पाण्याचे आरक्षण करण्यात आलेले आहे त्यानुसार गंगापूर व वैजापूर तालुक्यास हक्काचे पाणी मिळायला पाहिजे त्यामध्ये कोणतीही कपात करण्यात येउ नये प्रत्येक धरणातून २५ टक्के पाण्याचे आरक्षण करण्यात येत आहे त्यामुळे भविष्यात पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होईल व शेतक-यांना पण मोठया प्रमाणात अडचण निर्माण होईल त्यामुळे होत असलेल्या पाण्याच्या आरक्षणावर निर्बंध घालण्यासाठी प्रस्ताव शासनास पाठवावा असा ठराव सभागृहात पारीत करण्यात आला.

**सूचक - स.स.श्री.पंकज ठोंबरे** **अनुमोदन - स.स.श्री.मधुकर वालतुरे**

सचिव - वाळूज ग्रामपंचायतच्या बाबतीत सन्माननिय सदस्यांचा विषय आहे.

स.स.श्री.रमेश गायकवाड - वाळूज ग्राम पंचायतीच्या हद्दीतील गांवठाण जमीन २.५० हेक्टर वर ग्रामपंचायत सरपंच व हाशम पापा बिल्डर यांनी नमुना नं.८ मध्ये बसवून जमीन गिळंकृत / हडप करण्याचा प्रयत्न केला आहे. फेयाज कुरेशी यांनी याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांना व तहसिलदार गंगापूर यांना निवेदन दिले आहे. तहसिलदार यांनी स्थळपाहणी केली आहे. व उप अधिक्षक भूमी अभिलेख गंगापूर यांना कळविले असुन ग्रामपंचायत सदस्य यांनी सरपंचावर आक्षेप घेतला आहे. गावठाण जमीन भूमाफियाला देण्याचा प्रयत्न केला आहे. याबाबत ग्रामपंचायतीने ठराव घेतला आहे. बाजारभावाप्रमाणे या जमीनीची ५ कोटी रुपये किंमत आहे. हा भूखंड घोटाळा झालेला आहे. जे दोषी सदस्य आहेत व ज्यांनी यासाठी मदत केली आहे आहे त्यांचेवर कलम ३९(१) प्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करावी असा ठराव मी मांडतो.

स.स.श्री.किशोर पवार - स.स.श्री.रमेश गायकवाड यांनी जो ठराव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

ठराव क्रमांक (७५):- वाळूज ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गांवठाण जमीन २.५० हेक्टर वर ग्रामपंचायत सरपंच व श्री.हाशम पापा बिल्डर यांनी नमुना नं.८ मध्ये बसवून जमीन गिळंकृत / हडप करण्याचा प्रयत्न केला आहे. हया भूखंड घोटाळयामध्ये संबंधित ग्रामपंचयातीचे जे कोणी दोषी आहेत व ज्यांनी या कामात मदत केली आहे आहे

त्यांचेवर कलम ३९(१) प्रमाणे व इतर जबाबदार असणाऱ्यांवर नियमाप्रमाणे विभागाने चौकशी करुन कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचा ठराव सभागृहात पारीत करण्यांत आला.

**सूचक - स.स.**श्री.रमेश गायकवाड **अनुमोदन - स.स.**श्री.किशोर पवार

उप मु.का.अ.(पंचायत) - सदरील प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत संबंधित गट विकास अधिकारी यांना पत्र दिले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर त्यांनुसार दोषींवर नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

स.स.श्री.पंकज ठोंबरे - भऊरगांव येथे प्रा.आ.कें.मंजूर आहे परंतू त्यासाठी जागा उपलब्ध नाही. दवाखाना स्थलांतरीत करण्यांत यावा.

मा.उपाध्यक्ष - हा विषय उद्या होणा-या जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यात यावा.

स.स.श्री.किशोर पवार - जिल्हयामधील ग्रामपंचायतीमध्ये ग्राम विकास अधिकारी किती पदे भरलेली आहेत व किती पदे रिक्त आहेत ज्या ग्रामपंचायतीमध्ये ग्राम विकास अधिकारी ची पदे रिक्त आहेत त्याठिकाणी ग्राम विकास अधिकारी यांची पदस्थापना न करता ग्रामसेवकाना नियुक्त्या दिलेल्या आहेत. हयानियुक्त्या रद्द करण्याबाबत मागच्याबैठकीत विषय झालाहोता परंतू सदरील विषय प्रोसीडींगला आला नाही व त्याचे अनुपालनही आले नाही. तरी ज्या ठिकाणी ग्राम विकास अधिकारी यांचेऐवजी ग्रामसेवकांना नियुक्ती देण्यात आली त्या रद्द करण्यांत याव्यात असा ठराव मी या ठिकाणी मांडतो

स.स.श्री.अविनाश गलांडे- स.स.श्री.किशोर पवार यांनी जो ठराव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**ठराव क्रमांक (७६)** जिल्हयातील ज्या ग्रामपंचायतीस ग्राम विकास अधिकारी यांचे पदावर ग्रामसेवकांच्या नियुक्त्या करण्यांत आल्या त्या रद्द करुन तेथे ग्राम विकास अधिकारी यांची नियुक्ती करण्याचा ठराव सभागृहात पारित करण्यांत आला.

**सूचक - स.स.**श्री.किशोर पवार **अनुमोदन - स.स.**श्री.अविनाश गलांडे

स.स.श्री.पंकज ठोंबरे - राज्य व केंद्र शासनाच्या एसजीएसवाय अंतर्गत ७५:२५ प्रमाणात बचतगटाच्या इमारती बांधावयाच्या होत्या. एसजीएसवाय ही योजना शासनाने बंद केली. त्यामुळे इमारतींची कामे अर्धवट आहेत. याबाबत शासनाकडे पाठपूरावा केला तर ही कामे पूर्ण होउ शकतात. १०० बचतगट वैजापूरमध्ये आहेत. प्रत्येक गटामध्ये २५-३० महिला आहेत. महिलांना रोजागार मिळण्याच्या दृष्टीने ही कामे पूर्ण करुन घेण्यासाठी पाठपूरावा करावा.

I

शामुना-341-मकामुना(एच-72)-7-98-10,00,000 पीए5*
शा.प.वित्त विभाग क्र.संकीर्ण -1087/प्रक्र-86/कोषा-4
दिनांक 22 सप्टेंबर 1987

नमुना म.को.नि.6
(नियम 112 पहा)
चलान क्रामंOाक

सर्वसा 26 म.
Gen.26 m
DDO CODE No. 3101005181

| S.B.I Bank Aurangabad | या ठिकाणच्या कोषागारात /उपकोषागारात भरण्यात आलेल्या रोख रकमेचे चलान |
|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया, औरंगाबाद | भारतीय स्टेट बँकमध्ये/भारतीय रिझर्व्ह बँकेमध्ये |

| भरणा करणा-याने भरावयाचे - गट विकास अधिकारी गर्ग -१ पंचायत समिती फुलंब्री | विभागीय अधिका-याने किंवा कोषागाराने भरावयाचे | कोषागाराने/उपकोषागाराने/भारतीय रिझर्व्ह बँकेने/भारतीय स्टेट बँकेने/हैद्राबाद स्टेट बँकेने भरावयाचे |
|---|---|---|
| जिच्या वतीने रक्कम भरण्यात आली आहे त्या व्यक्तीचे नांव पदनाम आणि पत्ता | लेख्याचे वर्गीकरण<br>विभाग | रक्कम मिळाली Rs.19200/-<br>रुपये (आकडयात) Rs.19200/- |
| उपसंचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद. | प्रधानशिर्ष 4 4 0 2<br>उपप्रधानशिर्ष | अक्षरी रुपये ( एकोनिस हजार दोनशे रुपये) |
| भरणा करण्यासंबधीच्या प्राधिकारपत्राचा तपशील आणि भरणा करण्याचा उद्येश | गौणशिर्ष 4 4 0 2 1 1 9 3<br>संOगणक संकेतांक | कोषपाल<br>लेखापाल |
| १. गट विकास अधिकारी गर्ग -१ पंचायत समिती फुलंब्री विहिरीचे पाणी तपासणी शुल्क रु. १९२००/- | 4 4 0 2 1 1 9 3 0 0 | कोषागार/उपकोषागार अधिकारी/बँकेचा व्यवस्थापक |
| भरणा केलेली रक्कम (रुपये १९२००/-<br>अक्षरी रुपये ( एकोनिस हजार दोनशे रुपये) | बरोबर आहे.पैसे स्वीकारावे व पावती द्यावी.<br>Account Officer<br>G.S.D A., Aurangabad<br>स्वाक्षरी | |
| भरणा करणाराची स्वाक्षरी<br>दिनांक | दिनांक 1 JAN 2020 | दिनांक |

* येथे कोषागारात/बँकेत रक्कम भरणा करण्याबाबत आदेश देणा-या अधिका-यांचा रबरी शिक्का ठसवावा.

(मागे पहा)

38

E22 - R4 (D)

| | | |
|---|---|---|
| शामुना-341-मकामुना(एच-72)-7-98-10,00,000 पीए5* | नमुना म.को.नि.6 | सर्वसा 26 म. |
| शा.प.वित्त विभाग क्र.संकीर्ण -1087/प्रक्र-86/कोषा-4 | (नियम 112 पहा) | Gen.26 m |
| दिनांक 22 सप्टेंबर 1987 | चलान क्रमांक | DDO CODE No. 3101005181 |

| | |
|---|---|
| S.B.I Bank Aurangabad | या ठिकाणच्या कोषागारात /उपकोषागारात भरण्यात आलेल्या रोख रकमेचे चलान |
| स्टेट बँक ऑफ इंडिया, औरंगाबाद | भारतीय स्टेट बँकमध्ये/भारतीय रिझर्व्ह बँकेमध्ये |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरणा करणा-याने भरावयाचे - गट विकास अधिकारी गर्ग -१ पंचायत समिती फुलंब्री | विभागीय अधिका-याने किंवा कोषागाराने भरावयाचे | | | | | | | | | | कोषागाराने/उपकोषागाराने/भारतीय रिझर्व्ह बँकेने/भारतीय स्टेट बँकेने/हैद्राबाद स्टेट बँकेने भरावयाचे |
| जिच्या वतीने रक्कम भरण्यात आली आहे | लेख्याचे वर्गीकरण | | | | | | | | | | रक्कम मिळाली Rs.19200/- |
| त्या व्यक्तीचे नांव पदनाम आणि पत्ता | विभाग | | | | | | | | | | रुपये (आकड्यात) Rs.19200/- |
| उपसंचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद. | प्रधानशिर्ष | | 4 | 4 | 0 | 2 | | | | | अक्षरी रुपये ( एकोनिस हजार दोनशे रुपये) |
| | उपप्रधानशिर्ष | | | | | | | | | | |
| भरणा करण्यासंबंधीच्या प्राधिकारपत्राचा तपशील आणि भरणा करण्याचा उद्देश | गौणशिर्ष | | 4 | 4 | 0 | 2 | 1 | 1 | 9 | 3 | कोषपाल |
| | संगणक संकेतांक | | | | | | | | | | लेखापाल |
| १. गट विकास अधिकारी गर्ग -१ पंचायत समिती फुलंब्री विहिरीचे पाणी तपासणी शुल्क रु. १९२००/- | 4 | 4 | 0 | 2 | 1 | 1 | 9 | 3 | 0 | 0 | कोषागार/उपकोषागार अधिकारी/बँकेचा व्यवस्थापक |
| भरणा केलेली रक्कम (रुपये १९२००/- अक्षरी रुपये ( एकोनिस हजार दोनशे रुपये) | बरोबर आहे.पैसे स्वीकारावे व पावती द्यावी. Account Officer G.S.D A., Aurangabad | | | | | | | | | | |
| भरणा करणाराची स्वाक्षरी दिनांक | दिनांक 11 JAN 2020 | | | | | | | | | | दिनांक |

* येथे कोषागारात/बँकेत रक्कम भरणा करण्याबाबत आदेश देणा-या अधिका-यांचा रबरी शिक्का ठसवावा.

(मागे पहा)

शामुना-341-मकामुना(एच-72)-7-98-10,00,000 पीए5*
शा.प.वित्त विभाग क्र.संकीर्ण -1087/प्रक्र-86/कोषा-4
दिनांक 22 सप्टेंबर 1987

नमुना म.को.नि.6
(नियम 112 पहा)
चलान क्रामंाक

सर्वसा 26 म.
Gen.26 m
DDO CODE No. 3101005181

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| S.B.I Bank Aurangabad | या ठिकाणच्या कोषागारात /उपकोषागारात भरण्यात आलेल्या रोख रकमेचे चलान | | | | | | | | | | |
| स्टेट बँक ऑफ इंडिया, औरंगाबाद | भारतीय स्टेट बँकमध्ये/भारतीय रिझर्व्ह बँकमध्ये | | | | | | | | | | |
| भरणा करणा-याने भरावयाचे - गट विकास अधिकारी गर्ग -१ पंचायत समिती फुलंब्री | विभागीय अधिका-याने किंवा कोषागाराने भरावयाचे | | | | | | | | | | कोषागाराने/उपकोषागाराने/भारतीय रिझर्व्ह बँकेने/भारतीय स्टेट बँकेने/हैद्राबाद स्टेट बँकेने भरावयाचे |
| जिच्या वतीने रक्कम भरण्यात आली आहे त्या व्यक्तीचे नांव पदनाम आणि पत्ता | लेख्याचे वर्गीकरण | | | | | | | | | | रक्कम मिळाली Rs.19200/- |
| | विभाग | | | | | | | | | | रुपये (आकड्यात) Rs.19200/- |
| उपसंचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद. | प्रधानशिष | | 4 | 4 | 0 | 2 | | | | | अक्षरी रुपये ( एकोनिस हजार दोनशे रुपये) |
| | उपप्रधानशिर्ष | | | | | | | | | | |
| भरणा करण्यासंबधीच्या प्राधिकारपत्राचा तपशील आणि भरणा करण्याचा उद्येश | गौणशिर्ष | | 4 | 4 | 0 | 2 | 1 | 1 | 9 | 3 | कोषपाल लेखापाल |
| | संगणक संकेतांक | | | | | | | | | | |
| १. गट विकास अधिकारी गर्ग -१ पंचायत समिती फुलंब्री विहिरीचे पाणी तपासणी शुल्क रु. १९२००/- | 4 | 4 | 0 | 2 | 1 | 1 | 9 | 3 | 0 | 0 | कोषागार/उपकोषागार अधिकारी/बँकेचा व्यवस्थापक |
| भरणा केलेली रक्कम (रुपये १९२००/- अक्षरी रुपये ( एकोनिस हजार दोनशे रुपये) | बरोबर आहे.पैसे स्वीकारावे व पावती द्यावी. Account Officer G.S.D.A. Aurangabad स्वाक्षरी | | | | | | | | | | |
| भरणा करणाराची स्वाक्षरी दिनांक | दिनांक 1 JAN 2020 | | | | | | | | | | दिनांक |

* येथे कोषागारात/बँकेत रक्कम भरणा करण्याबाबत आदेश देणा-या अधिका-यांचा रबरी शिक्का ठसवावा.

(मागे पहा)

910

41

अत्यंत महत्वाचे

जा.क्रं.पंसफु/पापु/टंचाई/कावि/२०२०
कार्यालय पंचायत समिती फुलंब्री
दिनांक :– १/१/२०२०

प्रति,
सरपंच/ग्रामसेवक
ग्रा.पं.पाथ्री ता. फुलंब्री

विषय :–मौजे पाथ्री ता. फुलंब्री येथील शिवारातील गट क्रं. १२३,१४३,१४०,१४१,१४४ या गटातील विहिरीच्या पाण्याच्या जैविक व रसायनीक पाणी नमुने तपासणी शुल्क भरणे बाबत

संदर्भ क्रं. :– १) या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.पंसफु/पापु/टंचाई/कावि/१४५८/दिनांक २६/१२/२०१९
२) लेखाधिकारी जीएसडीए औरंगाबाद यांचे चलनप्रत दिनांक १/१/२०२०

वरील विषयान्व्ये कळविण्यांत येते की, मौजे पाथ्री ता.फुलंब्री गट क्रं. १२३,१४३,१४०,१४१,१४४ या गटातील विहिरीच्या पाण्याची जैविक व रसायनीक तपासणी करण्यासाठी मा. वरिष्ठ भु.वैज्ञानिक भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा प्रयोगशाळा शहानुरमियॉ दर्गा रोड औरंगाबाद यांना पाणी नमुने तपासणीसाठी संदर्भ क्रं. १ च्या पत्राकान्वये पाणी नमुने सादर केले होते.

परंतु आपण पाणी नमुनेचे शुल्क न भरल्याने प्रयोगशाळेचा अहवाल अप्राप्त आहे. त्यामुळे सदर गटातील लोकांना पिण्याच्या पाण्या बाबत कुठली उपाययोजना करावी या बाबत स्पष्टता निर्माण होत नाही.

संदर्भ क्रं. २ अन्वये प्रयोगशाळेने रुपये १९२००/– एवढया रक्कमेचे चलन भरण्या बाबत कळविले आहे. तेंव्हा सदरचे चलन यापत्रा सोबत जोडुन पाठविण्यात येते असुन तात्काळ सदर चलन भरुन प्रयोगशाळेचा रिपोर्ट हस्तगत करुन पुढील उपाययोजनेचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा. याप्रकरणी विलंब होणार नाही यांची दक्षता घेण्यात यावी.

गट विकास अधिकारी, वर्ग.1
पंचायत समिती फुलंब्री

सोबत :– 1) चलनाची प्रत 3 प्रतित

Ex- R4 -B

42

प्रती                                   दिनांक 3/1/2020

मा. वरिष्ठ भू-वैज्ञानिक भूजल

सर्वेक्षण विकास यंत्रणा

[illegible] रोड

विषय :- मौजे पाथ्री येथील गावातील पाणी नमुने रासायनिक तपासणी बाबत

संदर्भ :- दिनांक 3/1/2020 S. D. M. यांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी पत्रक

महोदय :- वरील विषयी विनंती की मौजे पाथ्री येथे दिनांक 3/1/2020 रोजी आरोग्य विभागाचे अधिकारी यांनी ठिकाणी भेट दिल्या प्रमाणे त्यांनी गावातील पाणी नमुने घेण्यात आले ते खालील प्रमाणे आहे

Received 7 samples [signature] 03/01/20

| क्र | शेतकऱ्याचे नाव | गट क्रमांक | स्त्रोत |
|---|---|---|---|
| 1 | भगवान शंकर सुरडकर | 123 | विहीर |
| 2 | संजय खंडू नगरे | 123 | विहीर |
| 3 | डॉ प्रमोद रावसाहेब जाधव | 143 | विहीर |
| 4 | शंकरराव ज्ञानु जाधव | 141 | विहीर |
| 5 | राजेंद्र भगवान जाधव | 140 | विंधन विहीर |
| 6 | दिनेश विनायक जाधव | 143 | विहीर |
| 7 | ग्रामपंचायत विंधन विहीर | 144 | विहीर |

वरील प्रमाणे गावातील पाणी नमुने घेण्यात आले आहेत तरी ते आपल्या प्रयोगशाळेत पाठवून

PTO

43 -मध्ये रासायनिक तपासणी करणे पाठविण्यात
येत आहे
-कृपया म अध्य सादर
टिप:- जोखत व कुंवामध्ये पाण्याचे नमुने जोखत
देण्यात येत आहे
-कृपया माहितीस्तव सादर

ग्रामसेवक
कार्यालय ग्रामपंचायत पाथ्री
ता फुलंब्री जि औरंगाबाद

620 — KU I.
जा.क्र.उपऔ/पापु/टंचाई/कावि/2020/37 59
कार्यालय उपविभाग जि.प.औरंगाबाद 44
दिनांक :– 13/1/2020
Ex-A-4-E

प्रति,
मा. उपविभागीय अधिकारी
पैठण–फुलंब्री मुख्यालय औरंगाबाद

विषय :– मौजे पाथ्री ता. फुलंबी येथील रसायनिक बाधीत झालेल्या शेतवस्ती करीता पिण्याचे पाण्याचे नियोजन करणे बाबतचा अहवाल सादर करणे बाबत

संदर्भ :– 1) दिनांक 3/1/2020 रोजी मौजे पाथ्री येथे आपण दिलेल्या सुचनेनुसार प्रत्यक्ष केलेली स्थळपाहणी अहवाल खालील प्रमाणे
2) ग्रामसेवक ग्रा.पं. पाथ्री ता. फुलंब्री यांचा दि. 13/1/2020 रोजी प्राप्त झालेला अहवाल

महोदय

वरील विषयी व संदर्भ अन्वये मौजे पाथ्री ता. फुलंब्री येथील गट कं. 123,140,143,141 मध्ये एकुण 6 कुटूंबाच्या बखारी असुन एका कुटुंबाचे घर आहे. अशा एकुण 7 कुटुंबातील व्यक्तीची संख्या 41 आहे. तसेच त्यांच्याकडे मोठी जनावरांची संख्या 27 असुन लहान जनावरांची संख्या 22 आहे. सद्यस्थितीत काही शेतकरी टॅकरने पाणी विकत घेता व काही शेतकरी डॉ. प्रमोद जाधव यांच्या पाईपलाईनद्वारे पाणी घेत आहे. असे ग्रामपंचायतीने लेखी या कार्यालयास कळविले आहे.

सदर शेतवस्तीसाठी 41 माणसांना व लहान/मोठे जनावरे धरुन प्रतिदिन सुमारे 3000 लिटर पाणी प्रतिदिन पाण्याची आवश्यकता आहे. सदर शेतवस्तीवर मागील वर्षी पाणी टंचाई मधुन एक नविन विंधन विहिर 200 फुट खोल व 6 इंची व्यासाची घेण्यात आली आहे. सदर बोअरच्या पाण्याचे नमुने व बाधीत झालेल्या शेतवस्ती वरील खाजगी विहिरीचे पाणी भुजल सर्वेक्षण विकास यत्रंणेच्या प्रयोगशाळे कडे ग्रामपंचायत मार्फत जैविक व रसायनिक तपासणी करीता दिनांक 3/1/2020 रोजी देण्यात आलेले आहे. सदर नविन विंधन विहिरीच्या पाणी नमुण्याचा अहवाल दिनांक 13/1/2020 रोजी प्राप्त झालेला असुन पाणी पिण्यास योग्य आढळुन आले आहे. सदर बोअरवर एकपंप बसवुन पाईपलाईनद्वारे ग्रामपंचायती मार्फत हंगामी स्वरुपात पाणी पुरवठा करता येवु शकेल. कायम स्वरुपी उपाययोजना म्हणुन मौजे पाथ्री गांवातील उंच जलकुंभा पासुन 1.5 कि. मी. पाईपलाईनद्वारे येत्या टंचाई कार्यक्रम मधुन TPWS (तात्पुरती पाईपलाईन योजना) द्वारे पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्या करीता ग्रामपंचायतीने TPWS (तात्पुरती पाईपलाईन योजना) चा प्रस्ताव टंचाई मधुन ग्रामपंचायतच्या ठरावाद्वारे रितसर मागणी करण्यात यावी.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कृति आराखडा सन 2018–19 मध्ये मौजे पाथ्री गांवासाठी योजना मंजुर असुन सर्वेक्षणाचे काम प्रगती पथावर आहे. सदर योजने मधुन एक स्वतंत्र पाईपलाईन शेतवस्ती करीता पाणी पुरवठा करण्यात येईल. तसे नविन अंदाजपत्रकात समाविष्ठ करण्यात येईल. व तेथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात येईल.

करीता संयुक्त अहवाल सविनय सेवेत सादर

| | | |
|---|---|---|
| सहा.भवैज्ञानिक<br>भु.स.वि.यं.जि.प.औरंगाबाद | उपविभागीय अभियंता (पापु)<br>जि.प.उपविभाग पा.पु.औरंगाबाद | गट विकास अधिकारी वर्ग 1<br>पंचायत समिती फुलंब्री |

**प्रतिलिपी**

1) मा. कार्यकारी अभियंता (पापु) जि.प.औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सेवेत सादर
2) मा. तहसिलदार फुलंब्री यांना माहितीस्तव सविनय सेवेत सादर
3) सरपंच/ग्रामसेवक ग्रा.पं. पाथ्री ता. फुलंब्री यांना देवुन कळविण्यात येते की, वरील गटातील शेतकरी (लोकांसाठी)यांच्यासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी TPWS (तात्पुरती पाईपलाईन योजना) द्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी तसा ठरावासह प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात यावा. तसेच शेतवस्तीवर घेण्यात आलेल्या नविन विंधन विहिरीवर आहे त्या निधी मधुन एक विघुतपंप बसवुन पाईपलाईनद्वारे बाधीत झालेल्या शेतकरी यांना पाणी पुरवठा करण्यात यावा. याप्रकरणी विलंब होणार नाही यांची दक्षता घेण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सहा.भवैज्ञानिक<br>भु.स.वि.यं.जि.प.औरंगाबाद | उपविभागीय अभियंता (पापु)<br>जि.प.उपविभाग पा.पु.औरंगाबाद | गट विकास अधिकारी वर्ग 1<br>पंचायत समिती फुलंब्री |

785

Regional Water Testing Laboratory
Office of the Deputy Director,
Groundwater Surveys and Development Agency,
Shahanurmiya Durgah Chowk, Near Krishi Office, Aurangabad- 431005
Email: ddau.gsda@gmail.com Phone: 0240-2331606 / 2334066 Fax: 0240-2331596

## TEST REPORT

| | |
|---|---|
| Report No.:GSDA/RWTL/AU/TR/ 71 /2020 | Date- 13 JAN 2020 |
| Name and Address of the Customer | Sr.Geologist , Groundwater Surveys and Development Agency, Aurangabad. |
| Reference no. and date: | Letter No. 03/2020. Date - 01/01/2020 |
| Date of Sample Receipt: | Date- 01/01/2020. |
| Sample Container: | White Plastic Can |
| Test Method : | APHA Method , 23nd Edition |

| Sr. No. | Taluka | Village | Sou. | Location | Date of Coll. | Date of Anal. | Colour* | Odour* | Tur NTU* | PH | E.C. µmh /cm | TDS mg/L | TH mg/L | Ca mg/L * | Mg mg/L* | Na. mg/L. * | K. mg/L* | Fe mg/L | TA mg/L* | CO3 mg/L* | HCO3 mg/L* | Cl mg/L * | F mg/L | No3 mg/L | So4 mg/L* | FIT /UNFIT |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Phulambri | Pathri | DW | BHAGAVAN SHANKAR SURADKAR GUT NO. 123 | 26.12.19 | 01.01.20 | Colourless | Odourless | 1.15 | 7.25 | 2930 | 1905 | 1160 | 240 | 136 | 39.2 | 0.5 | 0.04 | 260 | 0 | 260 | 500 | 0.4 | 109 | 119 | UNFIT |
| 2 | Phulambri | Pathri | DW | SANJAY KHANDU NAVGIRE GUT NO. 123 | 26.12.19 | 01.01.20 | Colourless | Odourless | 0.8 | 7.37 | 1640 | 1066 | 652 | 136 | 76 | 31.8 | 1.3 | 0.03 | 224 | 0 | 224 | 264 | 0.32 | 99 | 53 | UNFIT |
| 3 | Phulambri | Pathri | DW | DR. PRAMOD EKANATH JADHAV GUT 143 | 26.12.19 | 01.01.20 | Colourless | Odourless | 0.63 | 7.60 | 1200 | 780 | 484 | 96 | 59 | 35.2 | 3.2 | 0.02 | 256 | 0 | 256 | 178 | 0.31 | 43 | 46 | FIT |
| 4 | Phulambri | Pathri | BW (VINDHAN) | GANESH BHAGAVAN JADHAV GUT 140 | 26.12.19 | 01.01.20 | Colourless | Odourless | 0.73 | 7.20 | 1450 | 943 | 500 | 102 | 59 | 20.2 | 1.1 | 0.05 | 352 | 0 | 352 | 150 | 0.31 | 18 | 9 | FIT |
| 5 | Phulambri | Pathri | DW | SHESHRAO GYANU JADHAV GUT NO. 141 | 26.12.19 | 01.01.20 | Colourless | Odourless | 0.5 | 7.35 | 710 | 462 | 380 | 77 | 46 | 25.8 | 1.4 | 0.01 | 400 | 0 | 400 | 32 | 0.37 | 25 | 9 | FIT |
| 6 | Phulambri | Pathri | DW | MITREE SADHANA SHIKSHAN PRASARAK MANDAL PATHRI 144 | 26.12.19 | 01.01.20 | Colourless | Odourless | 1.1 | 7.71 | 1730 | 1125 | 696 | 139 | 85 | 38.1 | 0.5 | 0.03 | 176 | 0 | 176 | 314 | 0.29 | 88 | 62 | UNFIT |
| BIS(1055-2012) Highest Desirable limits | | | | | | | | | 1 | 6.5-8.5 | - | 500 | 200 | 75 | 30 | - | - | 1 | 200 | - | - | 250 | 1 | 45 | 200 | |
| BIS(1055-2012) Max.permissible limits | | | | | | | | | 5 | No Relaxn | - | 2000 | 600 | 200 | 100 | 200 | - | No Relaxn | 600 | - | - | 1000 | 1.5 | No Relaxn | 400 | |

Red- Parameter above max. permissible limit ( — )
Green- Parameter above highest desirable limit ( — )

Analyst:

(Dr. P. L. Salve)
Deputy Director,
Groundwater Surveys and Development Agency,
Aurangabad
( Authorised Signature)

Note:

1) Sampling was not done by Regional Water Testing Laboratory, Aurangabad Region.
2) The results relate only to the samples tested in this laboratory.
3) Executive Engineer, Gra.Pa.Pu.Vibhag, Zillha Parishad, Aurangabad for information.

COLOUR XEROX

497



**Regional Water Testing Laboratory**
**Office of the Deputy Director,**
**Groundwater Surveys and Development Agency,**
**Shahanurmiya Durgah Chowk, Near Krishi Office, Aurangabad- 431005**
**Email: ddau.gsda@gmail.com Phone: 0240-2331606 / 2334066 Fax: 0240-2331596**

# TEST REPORT

**Report No.:GSDA/RWTL/AU/TR/** 71 **/2020** **Date-** 13 JAN 2020

| | |
|---|---|
| **Name and Address of the Customer** | **Sr.Geologist, Groundwater Surveys and Development Agency, Aurangabad.** |
| **Reference no. and date:** | **Letter No. 36/2020. Date - 03/01/2020** |
| **Date of Sample Receipt:** | **Date- 03/01/2020.** |
| **Sample Container:** | **White Plastic Can (100ml)** |
| **Test Method :** | **APHA Method , 23 rd Edition** |

| Sr. No. | Lab No. RWTL/GSDA/ABD | Taluka | Village | Sou. | Location | Date of Coll. | Date of Anal. | Colour* | Odour* | Tur NTU* | PH | E.C. µmh /cm | TDS mg/L | TH mg/L | Ca mg/L * | Mg mg/L* | Na. mg/L. * | K. mg/L * | Fe mg/L | TA mg/L* | CO3 mg/L | HCO3 mg/L | Cl mg/L * | F mg/L | No3 mg/L | So4 mg/L* | Remark (Fit/ Unfit) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ABD/20/0006 | Phulambri | Pathri | DW | Dinesh Vinayak Jadhav Gut No.143 | 03.01.20 | 04.01.20 | Colourless | Odourless | 1.2 | 7.48 | 820 | 533 | 272 | 85 | 15 | 27.5 | 0.6 | 0.04 | 216 | 0 | 216 | 64 | 0.37 | 51 | 19 | Unfit |
| **Highest Desirable Limit** | | | | | | | | | | 5 | 6.5-8.5 | - | 500 | 200 | 75 | 30 | — | - | 1 | 200 | - | - | 250 | 1 | 45 | 200 | |
| **Max.Parmissible Limit** | | | | | | | | | | 10 | >8.5 | - | 2000 | 600 | 200 | 100 | 200 | - | No Relaxn | 600 | - | - | 1000 | 1.5 | No Relaxn | 400 | |

**Red-** Parameter above max. permissible limit ( )
**Green-** Parameter above highest desirable limit ( )

**Analyst:**

**(Dr. P. L. Salve)**
**Deputy Director,**
**Groundwater Surveys and Development Agency,**
**Aurangabad**
( Authorised Signature)

Note:
1) Sampling was not done by Regional Water Testing Laboratory, Aurangabad Region.
2) The results relate only to the samples tested in this laboratory.
3) The quality of water is dynamic. Therefore, it is advised to test the sample at regular intervals

COLOUR XEROX

47

ता.फुलंब्री जि.औरंगाबाद.-४३१ १११

ग्रामसेवक
श्री.आर.पी.जाधव
मो.क्र. ...९८२८२२

उपसरपंच
श्री.काकासाहेब भगवान जाधव
मो.क्र ९९५८५२०३३४

सरपंच
श्री.महेंद्र शिवाजीराव पाथ्रीकर
मो.क्र ९४२२२०५३७२

कार्यालय ग्रामपंचायत जा.क्र. पाथ्री ता.फुलंब्री.जि.औरंगाबाद

दिनांक 22/01/2020

प्रती

मा. गटविकास अधिकारी वर्ग १
पंचायत समिती फुलंब्री

विषय :- मौजे पाथ्री येथील रासायनिक बाधीत स्रोतांच्या तात्पुरती पाईप लाईन (TPWS) मंजुर करणे बाबत

संदर्भ :- आपले संयुक्त समितीचे पत्र दि 13/1/2020 च्या नोंदीया प्रमाणे

महोदय :- उपरोक्त वरील विषयी सविनय विनंती कि मौजे पाथ्री येथील ग्रामपंचायतची मासिक सभा दि 24/1/2020 ठराव क्र. 84 नुसार गट क्र 123, 140, 143, 141 या गटातील स्रोतांच्या मौजे पाथ्री येथील उंच जलकुंभ ते या स्रोतांच्या गटापर्यंत अंदाजे 1.5 कि.मी ची तात्पुरती पाईपलाईन मंजुर करण्यात यावी असा ठराव ग्रा.प.ने घेतला आहे त्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे

टिप :- सोबत ग्रा.प ठरावाची सत्यप्रत जोडली आहे
करीता माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर

आवक विभाग
कार्यालय प स फुलंब्री
दिनांक 23-1-2020

ग्रामसेवक
कार्यालय ग्रामपंचायत पाथ्री
ता.फुलंब्री जि.औरंगाबाद.

सरपंच
कार्यालय ग्रामपंचायत पा..
ता.फुलंब्री.जि.औरंगाबाद.

48

# प्रोसिडींग बुक

गांवकरी स्टोअर्स, औरंगाबाद फोन : २३४५२५५

| ता. / / | सकाळी / दुपारी वाजता |
|---|---|

कार्यालय ग्रामपंचायत पाथ्री ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

| कामकाजाचा ठराव व प्रस्ताव | ठराव |
|---|---|
| ६ | ७ |

आज दिनांक २४/०१/२०२० रोजी
मा. सरपंच श्री महेंद्र शिवाजीराव पाथ्रीकर
यांच्या अध्यक्ष स्थानी सभेच्या केलेल्या सुचना
व वेळ क्रमा प्रमाणे सभेचा कोरम पूर्ण
झाल्यावर ग्राम पंचायत कार्यालयामध्ये १ ते
५.५८ या स्थानिक विषयावर मासिक सभा
घेण्यात आली

विषय ५ वरिष्ठ कार्यालयाचे परिपत्रक व ठराव क्र ८५
सुचना वाचणे

सुचक :- बाबासाहेब भगवान जाधव

सभेत सुचविल्या प्रमाणे मा. अध्यक्षाच्या
परवानगीने श्री सचिव यांनी वरिष्ठ कार्यालया
चे परिपत्रक व सुचना आज सभेत स्थानिक
प्रमाणे वाचन करण्यात आल्या व सुचना दिल्या

परिपत्रक :- ① जा.क्र उपअ/पापु/टेपाई
कावि/२०२०/३१ ५९ दिनांक १३/१/२०२०
चे भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांचे पत्र जा.क्र. उपविभा
गीय अभियंता (पापु) जि.प. उपविभाग पापु कार्यालय
व गटविकास अधिकारी पं.स. फुलंब्री यांचे
संयुक्त पत्र

विषय :- मौजे पाथ्री ता. फुलंब्री येथील
रासायनिक बाधीत झालेल्या स्रोताच्या दुषित
पिण्याचे पाण्याचे नियोजन करणे बाबतचा
अहवाल सादर करणे बाबत

वरील पत्र सभेत तपासल्यावर

ग्रामसेवक
कार्यालय ग्रामपंचायत पाथ्री
ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.

49

# प्रोसिडींग बुक

गांवकरी स्टोअर्स, औरंगाबाद फोन : २३४५२५५

ता. / /

सकाळी / दुपारी वाजता

कार्यालय ग्रा.पं. पाथ्री ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

| कामकाजाचा ठराव व प्रस्ताव | ठराव |
| --- | --- |
| ६ | ७ |

वाचन करण्यात आले यामध्ये उप
योजना म्हणुन मौजे पाथ्री गावातील उंच
जलकुंभ पासुन १.६ कि.मी गट क्र 123, 150
153 151 या गटातील शेतक-यापर्यंत तात्पुरती
पाईपलाईन (TPWS) योजना ~~हे~~ -
मंजुर करण्यात यावी जेणे करुन या शेत-
-क-यांना या पाईपलाईन द्वारे पाणी पुरवठा
करता येईल यावर सखोल चर्चा विचार
होऊन प्रस्ताव सादर करण्यात यावा

तसेच गट क्र 150 गणेश भगवान
जाधव यांच्या शेतात नविन विद्युत विहीर
मुल.विभ जि.प.औ. यांच्या मार्फत घेण्यात आली
आहे या विद्युत विहीरीवर ग्रा.प. मार्फत -
विद्युत पंप बसविण्यात येऊन पाणी पुरवठा
सुरु करण्याबाबत सखोल निर्णय घेण्यात
आला परंतु सदरील विद्युत पंपासाठी विज
कोटेशन कोणाच्या नावे घेण्यात यावे या
बाबत पाथ्री कार्यक्षेत्रानी ग्रा.प.तील मार्ग-
दर्शन व्हावे यावर सखोल चर्चा विचार
होऊन सूचक श्री लिंगप्पा वामनराव कन्नोज
यांनी अनुमोदन दिले व ठराव पास करण्यात
आला

स.(५५/१)

ग्रामसेवक
कार्यालय ग्रामपंचायत पाथ्री
ता.फुलंब्री,जि.औरंगाबाद.

सरपंच
कार्यालय ग्रामपंचायत पाथ्री
ता.फुलंब्री,जि.औरंगाबाद.

Ezi-R-4 F1
303
50

जा.कं.पंसफु/पापु/टंचाई/कावि/2023
कार्यालय पंचायत समिती फुलंब्री
दिनांक :– 30/1/2023

प्रति,

मा.तहसिलदार,
फुलंब्री

**विषय :– मौजे पाथ्री ता.फुलंब्री येथील रहिवाशी वस्तीवर रासायनिक बाधित झालेल्या शेतक–या करीता पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी TPWS योजने अंतर्गत किंवा जल जीवन मिशन योजने अंतर्गत पाणी पुरवठा करणे बाबत**

संदर्भ :– 1) सरपंच/ग्रामसेवक ग्रा.पं. पाथ्री यांचा प्रस्ताव प्राप्त दिनांक 23/1/2020
2) या कार्यालयाचे पत्र जा.कं.पंसफु/पापु/टंचाई/काविव/45/2020 दिनांक 28/1/2020
3) कनिष्ठ भुवैज्ञानिक भु.स.वि.यं.जि.प.औरंगाबाद यांचे प्रपत्र ब दिनांक 13/2/2020
4) सरपंच/ग्रामसेवक ग्रा.पं. पाथ्री यांचा प्रस्ताव प्राप्त दिनांक 24/11/2022 प्राप्त दि. 3/1/2023
5) या कार्यालयाचे पत्र जा.कं.पंसफु/पापु/टंचाई/काविव/2023 दिनांक 3/1/2023
6) मा. तहसिलदार, फुलंब्री यांचे पत्र जा.कं.2023/दंडविभाग/निवेदन/कावि दिनांक 12/1/2023
7) कनिष्ठ भुवैज्ञानिक, भु.स.वि.यं.जि.प.औरंगाबाद यांचे पत्र जा.कं.जिपऔ/पापु/सभूवै/259/2023 दिनांक 19/1/2023
8) उपविभागीय अभियंता ग्रा.पाणी पुरवठा जि.प.उपविभाग औरंगाबाद यांचे पत्र जा.कं.जिपऔ/पापु/सभूवै/2/2023 दिनांक 23/1/2023

वरील विषयान्वये कळविण्यात येते की, मौजे पाथ्री ता. फुलंब्री येथील रासायनिक बाधित झालेंल्या गट कं. 112,123,124,141,143, व 144 मधील शेतवस्तीवरील लोकांना पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्या करीता उंच जलकुंभ (टाकी) ते सदर वस्तीपर्यत **TPWS** योजने अंतर्गत तात्पुरती पाईपलाईन करण्या बाबतचा प्रस्ताव ग्रामपंचायतीने या कार्यालयास सदंर्भ कं. 4 अन्वये या कार्यालयात सादर केलेला होता,

सदर प्रस्तावावर पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयाने संदर्भ कं. 5 अन्वये उपअभियंता पाणी पुरवठा जि.प. उपविभाग औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आला होता, परंतु सदर गांवास जलजीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत ही योजना मंजुर असुन निविदा प्रकिया पुर्ण होवून कामांसाठी कार्यादेश देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या योजनेमधुन यावस्तीसाठी पाईपलाईनचे काम करण्यात येणार असल्याबाबत संदर्भ कं. 7 व 8 अन्वये उपअभियंता व भुवैज्ञानिक यांनी या कार्यालयास कळविलेले आहे. तसेच उपअभियंता व भुवैज्ञानिक यांनी वस्तीस व ग्रामपंचायतीस भेट देवुन माहिती घेण्यात आली असता ग्रामपंचायतीने दिलेल्या माहितीनुसार आता या वस्तीवरील विहिरीचे पाणी दुषीत नाही. तरीही ही वस्ती गांवालगत असल्यामुळे वस्तीवरील ग्रामस्थ गांवातील R.O.Plant वरुन शुध्द पाणी घेवुन जातात व तेच पिण्यासाठी वापरतात असा संदर्भीय अहवालात त्यांनी या कार्यालयास कळविलेले आहे. करीता अहवाल पुढील योग्यत्या कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित.

27/3/23

गट विकास अधिकारी वर्ग 1
पंचायत समिती फुलंब्री

पुढे पहा......

//2//

**प्रतिलिपी**

1) मा. उपविभागीय अधिकारी पैठण–फुलंब्री मुख्यालय मुकूंदवाडी औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर
2) मा. कार्यकारी अभियंता (पापु) जि.प.औरंगाबाद यांना वरील प्रमाणे माहितीस्तव व उचीत कार्यवाहीस्तव सादर
3) उपविभागीय अभियंता (पापु) जि.प.उपविभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव
4) उपअभियंता (यांत्रिकी) जि.प.यांत्रिकी विभाग औरंगाबाद यांना देवुन कळविण्यात यते की, सदर वस्तीवर एक नविन विंधन विहिर घेण्यात आला होता. त्या विंधन विहिरीवर हातपंप बसविण्यात आला किंवा कसे सदर हातपंपास पाणी पिण्या योग्य आहे किंवा कसे? याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावा.
5) तालुका आरोगय अधिकारी फुलंब्री यांना देवुन कळविण्यात येते की, वरील गटातील वस्तीच्या विहिरीचे व तेथे घेण्यात आलेल्या हातपंपाचे व जवळ परिसरातील विहरीचे पाणी पिण्यास योग्य आहे किंवा नाही याबबात वस्तुनिष्ठ अहवाल प्रयोगशाळेच्या अहवालासह समक्ष सादर करण्यात यावा. याप्रकरणी दिरंगाई होणार नाही यांची दक्षता घेण्यात यावी.
6) ग्रामसेवक ग्रा.पं.पाथी ता.फुलंब्री यांना वरील प्रमाणे माहितीस्तव व कार्यवाहीस्तव देवुन कळविण्यात येते की, जलजीवन मिशन योजनेचे काम होई पर्यत जी.आय.पाईपलाईन ऐवजी पीव्हीसी पाईपलाईन करण्याच्या प्रस्ताव वित्त आयोगातुन करण्या सबंधी उचीत कार्यवाही करण्यात यावी.
7) विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती फुलंब्री यांना वरील प्रमाणे देवुन कळविण्यात येते की, वरील वस्तीसाठी 15 वित्त आयोग किंवा सदर वस्तीसाठी कुठली उपाययोजना करावी लागेल त्याबाबतचा सविस्तर अहवाल हे पत्र मिळताच माझे समक्ष सादर करावा
8) हातपंप विभाग, पंचायत समिती फुलंब्री यांना देवुन कळविण्यात येते की, सदर वस्तीवर एक नविन विंधन विहिर घेण्यात आली होती, त्या विंधन विहिरीवर हातपंप बसविण्यात आला किंवा कसे सदर हातपंपास पाणी पिण्या योग्य आहे किंवा कसे? याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावा.

गट विकास अधिकारी वर्ग 1
पंचायत समिती फुलंब्री

52

जिल्हा परिषद, औरंगाबाद
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
अंबा-अप्सरा सिनेमा समोर, औरंगपुरा, औरंगाबाद
Email : eebnaurangabad@gmail.com
दुरध्वनी क्र. ०२४० -२३३०६४९

जा.क्र.जिपऔ/पापु/निविदा-१/कावों/२०२३ 1155

दिनांक २४ / २/२०२३

ई-निविदा कार्यारंभ आदेश

815
B-1 2022-23
dt 08/03/23

प्रति,

स्वराज जगदीश दरख
प्लॉट नं. २४, शिवाजीनगर,
एच-१२, एन-४, सिडको ता.जि. औरंगाबाद
swarajdarakh०१@gmail.com

विषय-: जल जीवन मिशन अंतर्गत मौजे पाथ्री ता. फुलंब्री जि. औरंगाबाद येथे पाणी पुरवठा योजना सुधारणात्मक पुनर्जोडणी करणे या कामाचे कार्यारंभ आदेश. Teader ID: २०२२_AURAN_८५८२१७_७

संदर्भ:
१) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ग्रापाधो-१११५/प्र.क्र.५३/ पापु-०७ दि.९ मार्च २०१८
२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई, शासन परिपत्रक क्रमांक जेजेएम-२०२०/प्र.क्र.८४/पापु-१० दि.२० एप्रिल २०२०
३) कार्यकारी अभियंता, पा.पु जि.प, औरंगाबाद यांनी अ.क्र. २०३० दि. २३/०८/२०२२ रु. १५७८९०००/- ढोबळ रकमेस दिलेली तांत्रिक मान्यता
४) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन (DWSM) ने दि.०२/०६/२०२२ रोजीच्या बैठकीत दिलेल्या अनुषंगाने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रशासकीय मान्यता आदेश जाक्र / जिपऔ / पापु / जजीमी / निविदा /२०२२ /१२२७ दि.०७/०९/२०२२
५) आपली स्विकृत निविदा दि. / /२०२३.

जल जीवन मिशन अंतर्गत मौजे पाथ्री ता. फुलंब्री जि. औरंगाबाद येथे पाणी पुरवठा योजना सुधारणात्मक पुनर्जोडणी करणे या कामाकरीता आपण उपरोक्त संदर्भीय सर्व मान्यता व शासन निर्देश या बाबींच्या अधीन राहून कामकाज करण्यास सहमती दर्शविली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेची प्रशासकीय मान्यता दिनांक :- | ०७/०९/२०२२ |
| २ | मुळ निविदा रक्कम :- | १३९१८३६२ |
| ३ | कंत्राटदाराचा मुळ देकार :- | १३६३९९९४ |
| ४ | स्विकृत निविदा रक्कम मुळ निविदा रकमेच्या (-)२.०० कमी दराने | १३६३९९९४ |

आपणास मुळ निविदा रकमेच्या (-) २.०० कमी दराने प्रचलित दरसुची जुले २०२२ च्या अंदाजपत्रकीय दराने सदर योजनेचे काम करण्यास संदर्भीय शासन निर्णयानुसार जल जीवन मिशन अंतर्गत खालील अटी व शर्तीचे अधिन राहून कामकाज पुर्ण करावे या निर्देशांसह कार्यारंभ आदेश देण्यात येत आहेत.

अटी व शर्ती :-

१. मा. निविदा समितीने आपला देकार स्विकृत केल्यानंतर आपणास कार्यारंभ आदेश देण्यात येत आहेत.
२. वरील विषयांकीत कामासाठी रु. १३५००/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करुन देण्यात यावा तसेच सदर कामासाठी देय असलेल्या ४ % सुरक्षा ठेव रक्कमेपैकी १ % व सुरक्षा ठेव अनामत रक्कमेपैकी १ % रक्कम रुपये २७८३६०/- धनाकर्षाव्दारे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे कडे सादर करण्यात यावा. उर्वरीत रक्कम संभाव्य देयकाच्या रकमेतुन जि.प.मार्फत वजावट करण्यात येईल.
३. सदर योजनेकरिता सुधारणात्मक पुनर्जोडणीची कामे मंजुर करण्यात आली आहेत. शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु ०७/ दि.९ ऑक्टो.२०१३ नुसार स्त्रोताच्या शाश्वतेबाबत आवश्यकतेनुसार भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे योग्यता प्रमाणपत्र घेण्यात यावे व स्त्रोताचे पाणी पिण्यास योग्य असलेबाबत दाखला जिल्हा प्रयोगशाळेकडुन प्राप्त करुन घेणे आपणास बंधनकारक राहील.
४. संदर्भात दर्शविलेल्या प्रशासकीय मान्यता आदेशातील तसेच ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेतील सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

पृष्ठ २ वर. . . .

53

५. योजनेच्या कामावर पुरेसे अनुभवी तांत्रीक मनुष्यबळ नियुक्त करणे आवश्यक राहील, या संदर्भात संबंधित उप अभियंता यांचे निर्देशाचे पालन करावे
६. दिनांक १५ जुन २०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार योजनेचे शासन/जि.प. नियुक्त त्रयस्थ तांत्रीक संस्थांमार्फत परीक्षण करणे अनिवार्य राहील.
७. संदर्भ क्र. ०२ मधील नमुद शासन निर्णयान्वये सुधारणात्मक पुनर्जोडणीचे काम पुर्ण झाल्यानंतर किमान ०३ महिने (Trail Run) योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक करण्यात आले आहे. सदर चाचणी कालावधीमध्ये गावातील सर्व कार्यात्मक नळजोडणी(FHTC) समप्रमाणात कार्यरत होतील याबाबतची दक्षता घेण्यात यावी.
८. निविदेतील कामकाज पुर्ण झाल्यावर ते रितसर संबंधीत ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करावे व हस्तांतरण टिप्पणी जिल्हा परिषदेला सादर करावी.
९. सदर कामाची मुदत कार्यारंभ आदेशाच्या निर्गमीत केल्याच्या दिनांकापासुन ०९ महिने राहील. (काम पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मुद्यांवर भाववाढ/ दर बदल मान्य होणार नाही) तसेच योजनेच्या चाचणी कालावधीत दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी आपली राहील.
१०. काम चालु करणेपुर्वी कंत्राटदाराने संपुर्ण कामाचा (कामगारांसहीत) विमा सक्षम विमा कंपनीकडून काढावा व त्याबाबतची कागदपत्रे जिल्हा परिषद कार्यालयास ०१ महिन्यात सादर करावी. निविदेतील मंजुर करण्यात आलेली रक्कम ही वस्तु व सेवाकर वगळता उर्वरीत सर्व करांसह मंजुर केली आहे.सदरील वस्तु व सेवाकराच्या रकमेची अदायगी प्रचलीत शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येईल.
११. कामे सुरु करण्यापुर्वीच्या स्थितीचे व नंतरच्या स्थितीचे देयक मागणी प्रस्तावासोबत उपांगनिहाय फोटो सहित उप अभियंता यांच्या स्वाक्षरीने सादर करावेत. (उदा. कामाचे foundation, पंप हाऊस, पंपींग मशिनरी, जलकुंभ, रायझींग मेन, वितरण व्यवस्था, FTHC इ.)
१२. कामकाजासंदर्भात कालबध्द व नियोजनबध्द कार्यक्रम दिनांक सहित ७ दिवसांचे आत संबंधित उप अभियंता (पापु) यांचे मार्फत जि.प.ग्रा.पा.पु.विभागामध्ये सादर करणे अनिवार्य आहे.
१३. बिल अदायगीबाबत जिल्हा परिषद कोणतीही मुदतीची हमी देत नाही. राज्य / केंद्र शासनाकडून आवश्यक निधी जसा जसा उपलब्ध होईल, त्याप्रमाणेच देयके अदा करण्यात येतील. त्याबाबत आपणास न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.
१४. योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर संबंधीत उप अभियंत्यानी योजना/ काम पुर्णत्वाचा दाखला सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक राहील.
१५. योजनेच्या कामाच्या ठिकाणी परिशिष्ट ब मध्ये दर्शविलेल्या मापे व मानकाप्रमाणे नामफलक लावणे बंधनकारक राहील. फलकावर योजने विषयी सविस्तर माहिती देणे बंधनकारक राहील.
१६. योजनबाबत काही वाद उदभवल्यास त्याबाबत निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे राहतील.
१७. मुळ मंजुर निविदेतील कामापेक्षा अतिरीक्त काम करायचे झाल्यास त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची सुधारीत मान्यता घेणे आवश्यक राहील.
१८. सदर निविदेच्या परिशिष्ट ब मध्ये वितरण प्रणालीसाठी खोदकामाचा दर प्रस्तावीत करतांना, गावात असलेले सिमेंट कॉंक्रीट रस्ते तोडणे गृहीत धरुन खोदकामाचा सरासरी दर घेण्यात आलेला आहे. तथापी गावात प्रत्यक्ष काम करतेवेळी जर रोड खोदणे/कॉंक्रीट तोडणेची आवश्यकता भासली नाही तर प्रत्यक्ष भुस्तराप्रमाणे मजीप्रा दरसुची २०२१-२२ मधील दरानुसार अतिरीक्त बाब दरसुची मंजुरी करुन, देयक अदा करण्यात येईल.

संदर्भीय प्रशासकीय मान्यतेमध्ये दर्शविलेल्या तसेच वरील सर्व अटी व शर्ती आणि योजनेशी निगडीत सर्व प्रचलीत शासन निर्णय आपणावर बंधनकारक राहतील व त्यास अधिन राहुनच देयके मंजुर करण्यात येतील, याची नोंद घ्यावी

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद औरंगाबाद.

प्रत -१) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
२) उप अभियंता ग्रा.पा.पु.उपविभाग *औरंगाबाद* यांना माहिती देवुन सुचित करण्यात येते की, उपरोक्त अटी व शर्तीचे नुसार प्रस्तुत काम करण्यात येवुन देयक सादर करण्यात यावे
३) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार ---------------यांना देवुन विनंती करण्यात येते की, सदर कामकाजाचे संदर्भात आपल्या स्तरावर पर्यवेक्षण करण्यात यावे आणि आपल्या करारान्वयाप्रमाणे विहित प्रक्रिया प्रभावीपणे पार पाडावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद औरंगाबाद.